दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –२४७ शनिवार,दि.१० मे २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-247 Saturday, Dt.10 May 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# सांयकाळ होताच उरी व पुंछमध्ये पाकचा जोरदार गोळीबार:जैसलमेरमध्ये ब्लॅकआउट

## मोदींची तिन्ही माजी सैन्य प्रमुखांसोबत बैठक



प्रतिनिधी @ नवी दिल्ली

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाची परिस्थिती कायम आहे. शुक्रवारी संध्याकाळ होताच पाकिस्तानने जम्मू-काश्मीरमधील उरी, तंगधार, केरन, मेंढर, नौगाम आणि पूंछ या सहा सेक्टरमध्ये गोळीबार सुरू केला. त्याच वेळी, चंदीगड आणि अंबाला येथे हवाई हल्ल्याचा इशारा देण्यात आला आहे. लष्कराचे पश्चिम कमांड चंदीगडमध्ये आहे; एनआयए कार्यालयही तिथेच आहे. अंबाला येथे एक हवाई दलाचे तळ आहे.

दरम्यान, तेल कंपन्यांनी आयओसी, बीपीसीएल आणि एचपीसीएलने स्वतंत्र निवेदनात म्हटले आहे की देशात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा आहे. घाबरून खरेदी करण्याची गरज नाही. दरम्यान, कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान म्हणाले की, देशात धान्याचा पुरेसा साठा आहे.

पंजाबमधील फिरोजपूर आणि राजस्थानमधील जैसलमेरमध्ये संपूर्ण ब्लॅकआउट लागू करण्यात आला आहे.

भारत-पाकिस्तान तणावाशी संबंधित अपडेट्स

केंद्र सरकारने एक अधिसूचना जारी केली आहे. असे म्हटले जाते की जर लष्करप्रमुखांना हवे असेल तर ते प्रादेशिक सैन्याच्या (टीए) अधिकाऱ्यांना आणि सैनिकांना बोलावू शकतात. टीए हे एक निमलष्करी दल आहे जे गरज पडल्यास सैन्याला मदत करते.गृह मंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना आपत्कालीन अधिकारांचा वापर करण्याचे आदेश दिले आहेत.संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी, एअर चीफ

(उर्वरीत पान २ वर)

# विनाअनुदानित इंग्रजी शाळेतील रेश्मा पटेल यांना शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी खोटे प्रमाणपत्र देऊन शासनाची फसवणूक केली ?

## शिक्षणाधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करा अशी तक्रार मनीषा कोल्हे तर आमदार प्रकाश सोळंके यांनी मागणी केल्याने खळबळ !

### रेश्मा पटेल सारखे आणखी किती बोगस प्रमाणपत्रांची खैरात वाटली ?

विना अनुदानित शाळेतील रेश्मा पटेल यांना प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी बेकायदेशीर रित्या संस्थेने दिलेले प्रमाणपत्र प्रमाणित करून दिले. या बोगस प्रमाणपत्राच्या आधारावर त्यांनी पुढे शासकीय सेवेत थेट नोकरी मिळवली. फुलारी यांनी त्यांच्या कालावधीत रेश्मा पटेल सारख्या आणखी किती जणांना असे बोगस प्रमाणपत्र प्रमाणित करून दिले आहे ? हे देखील समोर येणे गरजेचे आहे.

### फुलारी यांच्या स्थावर जंगम मालमत्तेची चौकशी करा ?

प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी बीड येथे पदभार घेतल्यापासून आतापर्यंत अर्थपूर्ण व्यवहारातून लाखो नव्हे करोडो रुपयांची माया गोळा केल्याची उघड चर्चा होत आहे. तेव्हा त्यांची उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून त्यांच्या स्वतःच्या, कुटुंबाच्या, रक्ताच्या नात्यातील सर्वांची स्थावर जंगम मालमत्ता आणि बीड येथे पदभार घेतल्यापासून मिळवलेली प्रॉपर्टी याची ईडीने चौकशी करावी इतपत माया जमा केल्याची चर्चा होत आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी याप्रकरणी आपले चोख कर्तव्य बजावून कारवाई करतील का ?

बीड /प्रतिनिधी

प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका म्हणून श्रीमती रेश्मा पी जब्बार शेख प्रमाणपत्र प्रमाणित करून फसवणूक केल्याप्रकरणी बीड जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारे यांच्या विरुद्ध कारवाई होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी चौकशी देखील प्रस्तावित करण्यात आली आहे.

बीड शहरातील सलाम स हजरत शिर्षावली प्राथमिक शाळा,बीड येथे प्रशिक्षित झाल्याचे प्रमाणपत्र श्रीमती रेश्मा पी. जब्बार पटेल यांना सन २०१२ ते २०१५ या कालावधीचे संस्थेने प्रमाणपत्र दिले. सदर प्रमाणपत्र शिक्षणाधिकारी (प्रा.) यांनी प्रमाणित करून दिले. ते नेमके कसे दिले. असे प्रमाणपत्र शिक्षणाधिकाऱ्यांना प्रमाणित करून देता येते का ? जर देता येत नसेल तरीदेखील दिले असेल तर यामागे काय अर्थकारण दडलेले आहे ते देखील समोर येणे गरजेचे आहे.या प्रकरणी श्रीमती मनिषा पांडुरंग कोल्हे यांनी लेखी तक्रार केली आहे. तर




या प्रकरणी माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी दिनांक ६ जुलै २०२४ रोजी पत्र देऊन या प्रकरणाची चौकशी करून कारवाईची मागणी केलेली आहे. सदर प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

खाजगी विना अनुदानित इंग्रजी शाळेतील शिक्षकेचे प्रमाणपत्र प्रमाणित करून दिल्यामुळे फसवणूक केल्या प्रकरणी शिक्षणाधिकारी वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत.

# राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खासदार श्रीकांत शिंदे उद्या पाथरीत






## छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या भूमिपूजन सोहळ्यासह अनेक विकास कामाचे होणार उद्घाटन

दिलेला शब्द पूर्ण केला- ऐतिहासिक सोहळ्याला सर्वांनी उपस्थित राहावे- सईद खान

परभणी / जिल्हा प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे तसेच खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे उद्या पाथरी दौऱ्यावर आहेत एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीमध्ये पाथरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या कामाचे भूमिपूजन तसेच विविध विकास कामांच्या उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.महत्त्वाचं म्हणजे शिवसेनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्याला ही एकनाथ शिंदे संबोधित करणार आहेत.

पाथरी येथील शिवसेनेचे नेते तथा अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या वतीने पाथरी विधानसभेत विविध विकास काम करण्यात येत आहेत याच अनुषंगाने राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे,खासदार डॉ श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के हे उद्या पाथरी दौऱ्यावर असणार आहेत.उद्या दुपारी चार वाजता एकनाथ शिंदे,श्रीकांत शिंदे

(उर्वरीत पान २ वर)




## मोदींच्या नेतृत्वाखालील हा नवा भारत आहे.. पाकिस्तानला जशास तसे उत्तर दिले जाईल–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

तारकेश्वर गड येथील नारायण महाराज पुण्यतिथी उत्सवाच्या कार्यक्रमात उपस्थिती

बीड : –पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम भारत करत आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेला हा घुसके मारेंगे वाला भारत आहे.. आमच्या लाडक्या बहिणींचे कुंकू पुसण्याचे काम या दहशतवाद्यांनी केलं त्यासाठी ऑपरेशन सिंदूर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू करण्यात आले त्याचे मी स्वागत करतो.. पाकिस्तानला जशास तसे उत्तर द्यायचं काम आमचे जवान करत आहेत या दरम्यान महाराष्ट्रातील दोन जवान शहीद झाले त्यांना मी आदरांजली वाहतो असे म्हणत, केंद्राच्या मार्गदर्शक सुचने प्रमाणे महाराष्ट्रात सुरक्षा व्यवस्था ठेवण्यासाठी बैठक झाल्याची देखील एकनाथ शिंदे यांनी सांगितले..

बीडच्या तारकेश्वर गड येथे संत नारायण बाबा यांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.. यावेळी व्यासपीठावर आमदार सुरेश धस, जिल्हाप्रमुख अनिल जगताप

(उर्वरीत पान २ वर)

# बीड नगर परिषदेने शहरातील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये - शेख निजाम

## आजपासून सुरळीत पाणीपुरवठा होणार– मुख्याधिकारी नीता अंधारे





प्रतिनिधी @ बीड

मागील सहा महिन्यापासून बीड शहरांमध्ये नगरपरिषदेच्या नाकर्तेपणामुळे व नियोजन शून्यते मुळे झालेल्या अभूतपूर्व पाणी पुरवठाच्या संदर्भात बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम व भागवत तावरे,युवा नेते बळी गवते यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद प्रशासना विरोधात भव्य हंडा मोर्चाचे आयोजन दिनांक ९ मे २०२५ रोजी करण्यात आले होते.

सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील सर्वपक्षीय नेते नगरसेवक शेख अमर,मुन्नाभाई इनामदार , सय्यद इलियास, कय्युम इनामदार, आयुब पठाण, सय्यद फहीम,सय्यद आझम ,शेख हमीद,शहबाज कादरी, सत्तार इनामदार,शेख कदीर,शेख जाकीर, सादिक पठाण,शेख पाशा, जयंत वाघ,यांच्या सहित हजारो सुजाण नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सदरील मोर्चाच्या निमित्ताने उपस्थित असलेल्या भारतीय जनता पार्टीचे मा.जिल्हा परिषद अध्यक्ष मीराताई गादले, शहराध्यक्ष अशोकजी लोढा ,भारतीय जनता पार्टीच्या अँड संध्याताई राजपूत, नगरसेवक सय्यद इलियास, मुन्ना इनामदार ,रुपाली देशपांडे , पठाण रेहानाताई ,प्रीतताई

(उर्वरीत पान २ वर)

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा आढावा

प्रतिनिधी @ मुंबई

भारत आणि पाकिस्तानातील तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील एकूणच सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे...– प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.– ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत



समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.– ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा.– केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.– प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा. – प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.– एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या,

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर,
सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



शनिवार,दि.१० मे २०२५
SATURDAY, DT.10 MAY 2025



## संपादकीय

# रोहित पर्व विसावले

भारतीय क्रिकेट इतिहासामधील महत्त्वाचे पान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती घेतली. भारतीय कसोटी संघाचा कर्णधार म्हणून रोहित शर्माने आपल्या फलंदाजीच्या जोरावर जागतिक पातळीवर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. काही महिन्यापूर्वीच टी-२० प्रकारातून रोहित शर्माने निवृत्ती जाहीर केली होती. आयपीएल स्पर्धा मध्यावर आलेली असताना रोहित शर्माने आपली निवृत्ती जाहीर केल्याने क्रिकेटप्रेमींकडून हळहळ व्यक्त केली जात आहे. ज्या खेळाडूला आपण कधी आणि केव्हा थांबावे, हे जेव्हा समजते, त्याच खेळाडूला मान-सन्मानाने निवृत्ती मिळते. रोहित शर्मा हा खऱ्या अर्थाने मुंबईकर खेळाडू. मुंबईच्या अनेक खेळाडूंनी भारतीय संघाच्या कर्णधारपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळलेली आहे. कसोटी क्रिकेटमध्ये ज्याने प्रथम दहा हजार धावांचा टप्पा ओलांडला, त्या सार्वकालिक महान अशा सुनील गावस्करांपासून, दिलीप वेंगसरकर, रवी शास्त्री, सचिन तेंडुलकर अशा विविध रथी-महारथींचा त्यात समावेश होत आहे. एकेकाळी मुंबईच्याच खेळाडूंचा सर्वाधिक भरणा भारतीय क्रिकेट संघामध्ये पाहायला मिळत असे. पण जिथे भरती आहे, तिथे ओहोटी ही असतेच. जीवनात चढ-उतार हे येतच असतात. एकेकाळी भारतीय संघामध्ये प्राबल्य असणाऱ्या मुंबईकर खेळाडूंना आज त्याच भारतीय संघामध्ये अस्तित्वासाठी संघर्ष करावा लागत आहे. रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, यशस्वी जैयस्वाल, शिवम दुबे अशी नावे आज भारतीय संघातील कोणत्या ना कोणत्या फॉरमॅटमध्ये चमकताना पाहावयास मिळत आहेत. त्यातील यशस्वी जैयस्वालने मुंबईची साथ सोडून आगामी हंगामापासून गोवा क्रिकेटला आपलेसे करण्याचा निर्णय घेतला. शिवम दुबे अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. रोहित शर्मानंतर केवळ सूर्यकुमार यादवच्याच रूपाने सध्या तरी मुंबई क्रिकेटचे अस्तित्व भारतीय संघात पाहावयास मिळणार आहे. ही दुनिया उगवत्या सूर्याला नमस्कार करणारी आहे. जोपर्यत चलती आहे, तोपर्यंतच मान-सन्मानाला गती आहे. एकदा गती मंदावली की समाजात, आप्तस्वकियांमध्ये कोणी फारसे ओळखत नाही. तसाच काहीसा प्रकार अलीकडच्या काळात क्रिकेट खेळामध्ये रुजू झाला आहे. जोपर्यंत तुमच्या बॅटमधून धावांचा कारखाना सुरू आहे, जोपर्यत तुमच्या गोलंदाजीवर बळी मिळवत आहात, तोपर्यंतच तुमचे संघामध्ये स्थान निश्चित आहे. एकदा का तुमच्या बॅटमधून धावा येण्याचा वेग मंदावला, तुमच्या गोलंदाजीवर बळी मिळणे अवघड झाले की संघाचे दरवाजे तुम्हाला बाहेर पडण्यासाठी उघडले जातात. जागतिक पातळीवर नावलौकीक मिळविलेल्या खेळाडूला अशा प्रकारची 'आऊंटगोईंग' ही अपमानास्पदच असते. सुनील गावसकर हा चांगला खेळत असताना, अगदी शेवटच्या कसोटी सामन्यात पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात ९६ धावा केलेल्या असतानाही या 'अवलियाने' युवकांना संघात संधी मिळावी म्हणून वयाच्या ३३-३४व्या वर्षी निवृत्ती पत्करली. नाहीतर आजचे खेळाडू वयाची चाळीशी जवळ आली अथवा उलटली तरी निवृत्ती घेण्याचे नाव घेत नाहीत. मग अशा खेळाडूंची संघातून 'गंच्छती' ही ठरलेली असते.

रोहित शर्माला आज-ना उद्या क्रिकेटच्या कसोटी खेळातून निवृत्ती ही घ्यावी लागणार होतीच. त्याच्या बॅटमधून धावा निघत नव्हत्या, तसेच त्याच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाला कसोटी मालिकेमध्ये सातत्याने अपयशाचा सामना करावा लागत होता. आयपीएल स्पर्धेतही रोहित शर्मा हा गेल्या दोन सामन्यांत चांगली फलंदाजी करू शकला नव्हता. त्याचबरोबर रोहित शर्मा हा फक्त इम्पॅक्ट प्लेअर म्हणूनच खेळत होता. निवृत्ती जाहीर केल्यामुळे आता तो कसोटी क्रिकेटमध्येही खेळणार नसल्याचे आता स्पष्ट झाले आहे. आयपीएलनंतर भारतीय संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर जाणार होता. त्यासाठी रोहित शर्माची निवड होणार की नाही, याची चर्चा सुरू होती. पण निवड समितीने संघ निवडण्यापूर्वीच आपण कसोटी क्रिकेट खेळणार नसल्याचे आता रोहित शर्माने स्पष्ट केले आहे. रोहित शर्मा यापूर्वी ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात कर्णधार होता. या दौऱ्यात रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारताला पराभव पत्करावा लागला होता. या पराभवामुळे भारताला 'डब्ल्यूटीसी'च्या फायनलमध्ये खेळता आले नव्हते, पण त्यानंतर रोहित शर्मावर भारतीय क्रिकेटप्रेमींकडून, माजी खेळाडूंकडून जोरदार टीका झाली होती. रोहित शर्माला अखेरच्या कसोटीत खेळवलेच नव्हते. त्यावेळी रोहित शर्मा काहीच म्हणाला नव्हता. पण आता इंग्लंड दौऱ्यावर निवडच होणार नसल्याचे स्पष्ट झाल्यावर रोहित शर्माने अखेर कसोटी क्रिकेट न खेळण्याचा निर्णय घेतला आहे. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमध्ये चांगले नेतृत्व केले होते. विराट कोहलीनंतर रोहितने भारतीय कसोटी संघाला एक चांगल्या उंचीवर नेले होते. पण गेल्या मालिकेत मात्र रोहितच्या बॅटला सूर गवसला नव्हता. रोहित शर्माशिवाय भारतीय क्रिकेटचे कधीकाळी पानही हलत नव्हते, अर्थांत रोहितच्या कारकिर्दीतील हा सुवर्ण काळ होता. टी-२० एकदिवसीय सामने, कसोटी सामने अशा तीनही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचे नेतृत्व रोहित शर्मानी केलेले आहे. भारतीय संघाचे नेतृत्व टी-२० विश्वचषक जिंकल्यानंतर २९ जून २०२४ रोजी निवृत्ती जाहीर होईपर्यंत शर्मा भारताच्या ट्वेंटी-२० आंतरराष्ट्रीय संघाचा कर्णधार देखील होता.

# खा.शरदचंद्रजी पवार साहेब यांची उद्योजक भरत गिते यांच्या तौरल इंडिया प्रा.लि.कंपनी येथे गौरवपूर्ण सदिच्छा भेट

## शरद पवार साहेबांची उपस्थिती ही आम्हा सर्वांसाठी ऊर्जा व प्रेरणेचा स्रोत - भरत गीते
## उद्योजक भरत गिते यांचे औद्योगिक क्षेत्रातील कार्य नवीन उद्योजकांसाठी प्रेरणादायी

**प्रतिनिधी @ पुणे**

तौरल इंडिया प्रायव्हेट लि.कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्याल्युमिनियम मॅन भरत गिते भरत गीते यांचा संघर्ष आणि प्रकल्प तरुणांसाठी प्रेरणादायी आहे चाकण औद्योगिक वसाहतीमधील तौरल इंडिया प्रा.लि.या आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उत्पादन प्रकल्पास खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी तौरल इंडिया प्रायव्हेट.लि. कंपनी येथे सदिच्छा भेट दिली.यावेळी श्री. गित्ते यांनी त्यांचे स्वागत केले.दरम्यान भरत गित्ते यांनी तौरल इंडिया प्रायव्हेट.लि.या कंपनी च्या माध्यमातून नावलौकिक प्राप्त केले आहे.ल्युमिनियम मॅन भरत गिते यांनी औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करुन कामगिरी केली आहे. येणाऱ्या काळात उद्योजक भरत गिते यांचे औद्योगिक क्षेत्रातील कार्य नवीन उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे प्रतिपादन खा.शरदचंद्रजी पवार यांनी केले आहे.खा. शरदचंद्रजी पवार साहेबांची उपस्थिती ही आम्हां सर्वांसाठी ऊर्जा व प्रेरणेचा स्रोत असल्याचे प्रतिपादन उद्योजक भरत गिते यांनी केले आहे.तौरल इंडिया प्रायव्हेट लि. कंपनीचे एमडी तथा सीईओ आणि उद्योग जगतात आंतरराष्ट्रीय स्तरावर नावलौकिक करणाऱ्याल्युमिनियम मॅन भरत गिते यांच्या तौरल इंडिया प्रायव्हेट लि.कंपनी येथे देशाचे ज्येष्ठ नेते खा. शरदचंद्रजी पवार साहेब यांनी सदिच्छा भेट दिली.त्यांचे बीड व परळीचे भूमिपुत्र ल्युमिनियम मॅन भरत केशवराव गिते यांनी स्वागत केले.औद्योगिक क्षेत्रात विविध विषयावर सखोल अशी चर्चा केली गित्ते यांच्या कार्याचे कौतुक करत शुभेच्छा दिल्या.भरत गिते यांनी जर्मन कंपनीसोबत करार करून तब्बल ७०० ते ८०० लोकांची रोजगार निर्मिती करणारा उद्योग या ठिकाणी सुरूकेलेला आहे.२०१३ पासून ते उद्योग क्षेत्रात कार्यरत आहेत.सामान्य घरातून आलेल्या भरत गिते यांनी कष्ट,मेहनतीच्या बळावर उद्योजकतेत मोठं यश संपादन केलं आहे.त्यांचे कार्य निश्चितच सर्व तरुण उद्योजकांसाठी प्रेरणादायी असल्याचे खा.शरदचंद्र पवार साहेब म्हणाले.

खा.शरदचंद्र पवार साहेब यांनी संस्थापक भरत गिते यांच्याशी संवाद साधत त्यांचं कार्य,दृष्टिकोन आणि उभारणीच्या प्रवासाची सखोल माहिती जाणून घेतली.खा.शरदचंद्र पवार साहेब म्हणाले, या ठिकाणीयेण्याआधी भरत गिते यांच्याशी भेट झाली होती.त्यांनी त्यांच्या कार्याची सविस्तर माहिती माझ्यापुढे मांडली.मी त्यांच्याबद्दल आणि त्यांच्या संस्थेबद्दलकाही लोकांकडून पूर्वीही ऐकलं होतं.त्यांच्या कार्यपद्धतीनं पवार साहेब प्रभावीत झाले आणि त्यांचा प्रकल्प प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा निर्माण झाली. त्यामुळे मी आज इथे आलो आहे. पुढे बोलताना पवार साहेबांनी महाराष्ट्रातील औद्योगिकीकरणाच्या वाटचालीवर भाष्य केलं.त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी उद्योग उभारले खरे, पण त्यामागचा उद्देश इंग्लंडमधील कारखान्यांना आवश्यक असलेला कच्चा माल भारतातून घेऊन जाण्याचा होता,असे सांगितले.त्यांनी स्पष्ट केलं की स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राच्याऔद्योगिकी करणाला खऱ्या अर्थाने चालना मिळाली ती यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यकाळात. त्यांच्या नेतृत्वाखाली एमआयडीसी,महाराष्ट्र फायनान्स कॉर्पोरेशन, महाराष्ट्र विद्युत मंडळ यांसारख्या संस्थांची स्थापना झाली,ज्यामुळे राज्यात औद्योगिक पाया मजबूत झाला. त्यानंतर माझ्यासह वसंतराव नाईक, वसंतराव दादा पाटील यांच्या नेतृत्वात वशलशर्पीरश्रळीशव (विकेंद्रित)औद्योगिक धोरण राबवण्यात आलं.याच संदर्भात त्यांनी भरत गिते यांच्या प्रवासाचं विशेष कौतुक केलं.मराठवाड्याने निजामशाहीचा संघर्ष अनुभवला आहे.परळी, बीड सारख्या भागात नैसर्गिक परिस्थितीही प्रतिकूल आहे.अशा परिस्थितीतून झगडत पुढे आलेल्या,संघर्षातून तावून सुलाखून निघालेल्या व्यक्तींमध्ये श्री.भरत गिते यांचा आवर्जून उल्लेखकरावा लागेल.त्यांनी जर्मनीत जाऊन तांत्रिक शिक्षण घेतलं,तेथे नोकरी केली आणि त्या अनुभवाचा उपयोग करत शून्यातून एक अत्याधुनिक प्रकल्प चाकणमध्ये उभा केला आहे.ही गोष्ट प्रेरणादायी आहे.तसेच त्यांनी उद्योग,शेतीआणि आयटी क्षेत्रात झालेल्या प्रगतीचा मागोवा घेत,



पिंपरी-चिंचवड,चाकण, रांजणगाव,शिरूर, बारामती,इंदापूर आणि भिगवन भागात झालेल्या औद्योगिक विकासाबद्दलही समाधान व्यक्त केलं. आज या ठिकाणी मी जे पाहिलं,ते खरोखरच आशादायक आहे.श्री. भरत गिते यांचा उद्योग या भागातील तरुणां साठी प्रेरणास्त्रोत ठरेल, याची मला खात्री आहे, असेही त्यांनी शेवटी नमूद केलं.ज्येष्ठ नेते खा.शरदचंद्रजी पवार साहेब यांची तौरल इंडिया प्रा.लि.येथे झालेली सदिच्छा भेट ही आम्हा सर्वांसाठी ऐतिहासिक आणि गौरवशाली असल्याचे प्रतिपादन संस्थापक भरत गित्ते यांनी व्यक्त केलं.खा.शरदचंद्रजी पवार साहेबांचे स्वागत करताना म्हटलं,साहेब, आपण स्वतः येथे आलात,त्याबद्दल मन:पूर्वक आभार. आजचा दिवस हे तौरल इंडियाच्याइतिहासातील एक उत्सवाचा आणि ऊर्जेचा क्षण आहे. आपल्या दूरदृष्टीतून औद्योगिक,सहकारी आणि सामाजिकक्षेत्रात जे कार्य घडलं आहे, त्यातूनच आधुनिक महाराष्ट्राची घडण झाली आहे.आपल्या निर्णयक्षम नेतृत्वाचा ठसा गेल्या ५०-६० वर्षांच्या प्रत्येकटप्प्यावर स्पष्टपणे जाणवतो.

तौरल इंडियाच्या प्रवासा विषयी सांगताना,गिते म्हणाले की, केवळ १० कर्मचाऱ्यांपासून २०१३ साली या कंपनीची सुरुवात केली आणि आज ती नवभारत घडविण्याच्या दृष्टीने ॲल्युमिनियम कास्टिंग पुरवठा करणारी एक विश्वासार्ह कंपनी बनली आहे.माझी जन्मभूमी मराठवाडा ही संघर्षाची भूमीआहे,पणतितक्याच ताकदीचीसुद्धा.त्या मातीतूनच एक उद्योगपती म्हणून घडू शकलो.हे सहज शक्य नव्हतं,ती एक प्रकारची अग्निपरीक्षा होती.मात्र आपण आमच्या सारख्या तरुणांसाठी एक 'मराठवाडाव्हिजन' तयार केलात तर अनेक तौरल इंडिया घडू शकतात.शेवटी त्यांनी पवार साहेबांच्या भेटी बद्दल आनंद व्यक्त केला आणि पुढील प्रेरणादायी सहकार्या बद्दल आशा व्यक्त केली.यावेळी उपस्थित मान्यवरांशी,सर्व कर्मचारी वर्गाशी संवाद साधला तसेच ल्युमिनियम मॅन भरत गिते यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.उपस्थितीमध्ये खा.निलेश लंके,माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, रामराव गित्ते व विविध क्षेत्रात मान्यवरउपस्थित होते.साहेब,आपण स्वतः येथे आलात, त्याबद्दल मन:पूर्वक आभार.आजचा दिवस हे तौरल इंडियाच्या इतिहासातील उत्सवाचं क्षण आहे.आपल्या दूर दृष्टीमुळे महाराष्ट्रातील प्रत्येक टप्प्यावर सकारात्मक बदल घडले.आज आपण आलात यामुळे आम्हा सर्वांना नवचैतन्य,ऊर्जा व प्रेरणा मिळाली.

- श्री.भरत गीते, संस्थापक,तौरल इंडिया प्रा.लि.

मराठवाड्यासारख्या संघर्षमय भूमीतून आलेले श्री.भरत गिते यांनी जर्मनीत ज्ञान मिळवून शून्यातून उभारलेला हा प्रकल्प आजच्या तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरेल.

- शरदचंद्रजी पवार, खासदार



# डॉ.सय्यद हुमायुद्दीन यांचा जशने शादी सोहळा थाटात संपन्न

**प्रतिनिधी @ आष्टी**

आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अँडवोकेट बी. डी. हंबर्डे महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रा. तथा प्रसिद्ध कवी सय्यद अल्लाउद्दीन यांचे चिरंजीव तथा आष्टी येथील सय्यद डेंटल क्लिनिकचे डॉ. सय्यद हुमायुद्दीन यांचा विवाह छ. संभाजीनगर येथील डॉ. शेख अब्दुल कादर कादरी यांची कन्या डॉ. मेहवश गौसिया हिच्याशी बुधवार दिनांक सात मे रोजी शहनाज फंक्शन हॉल येथे थाटात संपन्न झाला.

यावेळी सय्यद आणि शेख परिवारातील आप्त, स्नेही त्याचबरोबर न्यायालयाचे न्यायमूर्ती, मुंबई येथील कन्स्ट्रक्टर मलिक साहेब, पुणे येथील व्यावसायिक सय्यद मगदूम, डॉ. मुजाहिद, प्रा. नरहरी पवार, प्रा.षअशोक भोगाडे, प्रा. अनंत देशमुखे, तात्यासाहेब शेंडगे, सचिन रानडे, चिंचाळा येथील माजी सरपंच अशोक पोकळे, दिगंबर पोकळे, गणेश धुमाळ, आत्माराम पोकळे पाटील, सोमीनाथ पोकळे, राजकुमार पोकळे, गौरव राजे निंबाळकर, अंबादास पोकळे, अनेक ग्रामस्थ, मित्रपरिवार, रामकृष्ण हॉस्पिटलचे डॉ. संदीप हंबर्डे, डॉ. सायंबर तसेच पुणे, मुंबई, श्रीरामपूर, मराठवाड्यातील अनेक मान्यवर आणि कवी, साहित्यिक उपस्थित होते.

# ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने आज परळीत आगळावेगळा सामूहिक विवाह सोहळा

**प्रतिनिधी @ परळी**

ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने ११ गरीब कुटुंबातील जोडप्यांचा आगळा वेगळा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला आहे. प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या बाजूला असलेल्या हलगे गार्डन येथे आज दिनांक १० मे रोजी दुपारी १२.३० वाजता या विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, जवळपास ४ हजार पाहुणेमंडळी या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत. तसेच हा कार्यक्रम संपूर्णतः पर्यावरणपूरक असणार असून कुठेही प्लॅस्टिकचा वापर केला जाणार नाही अशी माहिती ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक मयंक गांधी यांनी दिली. यासंदर्भात जिव्हिटीच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी डॉ. हरिश्चंद्र वगे यांची उपस्थिती होती.

## हुंडा न देण्याची आणि न घेण्याची दिली जाणार शपथ
## चार हजार पाहुण्यांची असणार उपस्थिती
### संपूर्ण कार्यक्रम असणार पर्यावरणपूरक; प्लास्टिक साहित्यावर बंदी



ग्लोबल विकास ट्रस्टचे संचालक मयंक गांधी यांच्या वतीने परळी तालुक्यात मोठी सामाजिक चळवळ उभी करण्यात आली आहे. ट्रस्टच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात येतात. याच ट्रस्टच्या सल्लागार समितीचे सदस्य प्रदीप खेरुका यांचे कुटुंब, त्यांच्या कन्या अलकनंदा रूईया आणि जावई यांच्या वतीने ११ गरीब जोडप्यांच्या विवाहासाठी १५ लक्ष रुपयांची मदत देण्यात आली आहे. लंडन येथे झालेल्या लग्न सोहळ्याच्या निमित्ताने ही देणगी संबंधित कुटुंबाने दिली आहे. आजमितीस अनेक अशी कुटुंबे आहेत ज्यांना की मुलींच्या लग्नाचा भर झेपत नाही. यातूनच अनेकांच्या आत्महत्या होतांना ग्लोबल विकास ट्रस्टने अनुभवलेले आहे. या समस्यांवर उपाय म्हणून हा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न होत आहे. या विवाह सोहळ्यात हुंडा न देण्याची आणि न घेण्याची शपथ दिली जाणार आहे.

ग्लोबल विकास ट्रस्टकडून नवदाम्पत्याला सर्व संसारोपयोगी साहित्य भेट म्हणून दिले जाणार असून, प्रत्येक जोडप्याच्या नावे संयुक्तरीत्या ७० हजार रुपयांच्या मुदत ठेव प्रमाणपत्र त्यांना दिले जाणार आहे. या आगळ्यावेगळ्या सामुदायिक विवाह सोहळ्यास सुमारे चार हजार पाहुणेमंडळी उपस्थित राहणार असल्याची माहिती संयोजकांच्या वतीने देण्यात आली आहे.

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश**
**क. स्तर, गेवराई**
**गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क.४२८/२०२५**
**आण्णा वि. निरंक**
**(मार्फत ॲड. आय. बी. नागरे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे कलाबाई भ्र. सदाशिव पाटोळे, रा. संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड या दिनांक १५/०६/२०२१ रोजी रा. मौजे संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत.

अर्जदार आण्णा पि. सदाशिव पाटोळे, वय ५५ वर्षे,
धंदा मजुरी, रा.संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे कलाबाई भ्र. सदाशिव पाटोळे, रा. संजयनगर, गेवराई, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ०७/०५/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख २६/०६/२०२५

| स्वाक्षरित | | स्वाक्षरित |
|---|---|---|
| क.लिपीक | शिक्का | सहाय्यक अधीक्षक |
| दिवाणी न्यायालय, | | दिवाणी न्यायालय, |
| क.स्तर, गेवराई | | क.स्तर, गेवराई |

## पान १ वरून...

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस...**

त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.- पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिंग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.- सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.- सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या- नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.- शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या- सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

**बीड नगर परिषदेने ...**

कुकडेजा, सोनलताई पाटील, आदी आदींनी पाणीपुरवठा स्वच्छता व नगर परिषदेच्या गैरव्यवहार बाबत संबोधित केले. यावेळी लोकपत्रकार भागवत तावरे यांनी बीड नगर परिषदेमध्ये एकूणच चाललेला निरंकुश गैरव्यवहार व त्यामुळे होणारी बीड शहरातील नागरिकांची हेळसांड या प्रश्नावर आपले सविस्तर मत मांडले. सदरील मोर्चाचे आयोजक शेख निजाम यांनी आपल्या संबोधनांमध्ये बीड नगर परिषदेने आपले कर्तव्य समजून बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यावा ज्यात प्रामुख्याने विस्कळीत असलेला पाणीपुरवठा सुरळीत करून किमान आठ दिवसाला शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी बीड शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून युद्ध पातळीवर नालेसफाई व कचऱ्याची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यात यावे व बीड शहरातील बंद अवस्थेत असणाऱ्या सर्व पथदिवे चालू करण्यात यावे अशा मागण्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना दिलेल्या निवेदनात मागितल्या. यानुसार त्यांनी पालकमंत्री मा.अजित दादा पवार यांच्या सूचनेनुसार सदरील मागण्या मान्य केल्या व तात्काळ आज पासून सुरळीतपणे पाणीपुरवठा व स्वच्छता व ईतर सर्व कामे पूर्ण करून करू अशी ग्वाही शिष्टमंडळास दिली.यावेळी भव्य हंडा मोर्चात मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते व यामध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती.

**सांयकाळ होताच उरी...**

मार्शल एपी सिंग आणि सीडीएस अनिल चौहान यांनी ताज्या परिस्थितीची माहिती दिली.गृहमंत्र्यांनी बीएसएफ आणि सीआयएसएफ अधिकाऱ्यांसोबतही बैठक घेतली. त्यांनी भारत-पाकिस्तान सीमा आणि विमानतळांच्या सुरक्षेची माहिती घेतली. कृषी मंत्रालय आणि आरोग्य मंत्रालयानेही तयारीबाबत बैठक घेतली.गेल्या ३ दिवसांपासून पाकिस्तानी सैन्य नियंत्रण रेषेवर (एलओसी) सतत गोळीबार करत आहे. यामध्ये १७ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये ५ मुलांचाही समावेश आहे. अनेक इमारती आणि वाहनांचेही नुकसान झाले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निवासस्थानी तिन्ही सशस्त्र दलांच्या माजी

## पान १ वरून...

प्रमुखांची भेट घेतली.

**राज्याचे उपमुख्यमंत्री....**

यांचे मानवत येथील मैदानावर हेलीकाप्टर ने आगमन होईल यानंतर तिथून मानवत येथील शिवसेनेचे पदाधिकारी बाळासाहेब कुर्हाडे यांच्या निवासस्थानी मानवत येथील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आलीय.त्यानंतर तिथूनच मानवत येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ शिवसेनेच्या वतीने आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे ह्या उद्घाटनानंतर एकनाथ शिंदे तसेच श्रीकांत शिंदे हे पाथरी कडे निघणार असून पाथरी येथील सेलू कॉर्नर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या भूमिपूजन कार्यक्रमाला उपस्थित राहून भूमिपूजन पार पडणार आहे यानंतर ते साईबाबा तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत साई मार्ग येथे रस्त्याचे भूमिपूजन करण्यात येणार आहे तसेच साईबाबा मंदिराची पाहणी ही करण्यात येणार आहे त्यानंतर तिथून राम मंदिर येथील

वाग्रह तसेच संरक्षक भिंतीच भूमिपूजन सोहळा त्यानंतर नमाजे जनाजा याचे भूमिपूजन तिथून

पाथरी नगरपरिषद येथे परभणी जिल्ह्यातील महानगरपालिका तसेच नगरपालिका यासंदर्भातील विकास कामांच्या आढावाची बैठक सर्व अधिकाऱ्यांसमवेत एकनाथ शिंदे घेणार आहेत त्यानंतर सईद खान यांच्या घरी सर्व नेते जाणार आहेत.सायंकाळी सातच्या दरम्यान जिल्हा परिषद मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या शिवसेनेच्या पदाधिकारी मेळाव्याला सर्व नेते पोहोचतील आणि तिथं हा मेळावा पार पडणार आहे. पाथरी येथील सर्व विकासकामांचे भूमिपूजन आणि शिवसेनेच्या पदाधिकारी मेळाव्याला सर्वांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे वतीने आसिफ खान जिल्हाप्रमुख नाना टाकळकर तसेच इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

आजपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे राजकारण करून इथल्या राजकारण्यांनी आपली पोळी भाजून घेतली आणि पुतळ्याला अंतर्गत विरोध केला मात्र मी पाथरी करांना शब्द दिला होता तो आज पूर्ण करतोय सेलू कॉर्नर येथे महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्यदिव्य पुतळा उभा राहणार आहे ज्याची पायाभरणी मा एकनाथजी शिंदे साहेब डॉ श्रीकांत शिंदे साहेब करणार आहेत शिवाय इतरही विकास कामांचे भूमिपूजन होणार आहे या ऐतिहासिक सोहळ्याला सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेनेचे नेते तथा अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांनी केले आहे.

**मोदींच्या नेतृत्वाखालील....**

सचिन मुळूक यांची प्रमुख उपस्थिती होती.. गडाच्या विकासासाठी आवश्यक ती मदत आपण करणार असल्याचा शब्द देखील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी गडाचे महंत आदिनाथ महाराज यांना दिला.. कार्यक्रमासाठी गडावरील हेलिपॅड वर त्यांचे आगमन झाले त्यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन तसेच पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांनी प्रशासनाच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

# युवा नेते अक्षय मुंदडाची संवेदनशीलता

## युध्दजन्य परिस्थितीमुळे वाढदिवसाचे कार्यक्रम रद्द केले, चला हवा येऊद्या कार्यक्रम पुन्हा होणार, शहराध्यक्ष संजय गंभीरे यांची माहिती

प्रतिनिधी @ अंबाजोगाई

भारतीय जनता पार्टीचे युवा नेते अक्षय मुंदडा यांनी स्वतःच्या वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम देशात सुरू असलेल्या युध्दजन्य परिस्थितीमुळे रद्द केले असून कुठलेही जाहीर कार्यक्रम होणार नसल्याचे संयोजकांनी सांगितले. दरम्याण चला हवा येऊ द्या आणि मराठी पाऊल पडतेत पुढे. दोनही कार्यक्रम युध्द संपल्यानंतर निश्चित घेवू अशी माहिती भाजपा चे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी दिली. राजकारण करताना देशभक्तीतली संवेदनशिलता कशी जपल्या जाते याचे आदर्श उदाहरणच म्हणावे लागेल.

उद्याच्या १३ मे रोजी भाजपा चे युवा नेते अक्षय मुंदडा यांचा वाढदिवस असून त्यानिमित्ताने शहरात कार्यकर्त्यांनी विविध कार्यक्रमाचे केले होते. ज्यामध्ये चला हवा येऊद्या, प्रसिध्द अभिनेते निलेश साबळे यांचा कार्यक्रम तर मराठी पाऊल पडते पुढे आदी सांस्कृतिक कार्यक्रम १३ मे ला शहरात होणार होता. पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पुर्व तयारी जोरदार केली होती. त्यासाठी मध्यवर्ती असलेल्या सेंट अँथोनी शाळेचे मैदान पण निवडले होते. मात्र दोन दिवसापासून पाकिस्थान सोबत सुरू झालेले युध्द त्यानंतर संपूर्ण देशात निर्माण झालेल्या युध्दजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अक्षय मुंदडा यांनी स्वतःच वाढदिवसानिमित्त आयोजित केलेले सर्व कार्यक्रम रद्द करण्याच्या सुचना आपल्या सहकारी कार्यकर्त्यांना केल्या असून कोणीही मोठा गाजावाजा करत कार्यक्रम करू नये असे सांगितले त्यामुळे चला हवा येऊद्या हा कार्यक्रम रद्द करण्यात आला. दरम्याण सद्यस्थितीत कार्यक्रम रद्द झाला असला तरी, याच सांस्कृतीक कार्यक्रमाची मेजवाणी आम्ही निश्चितच युध्दजन्य परिस्थिती संपल्यानंतर शहरवासियांना देणार असल्याचे भाजपाचे शहराध्यक्ष संजय गंभीरे यांनी सांगितले. दि. २२ एप्रिल रोजल पाकिस्थानी दहशतवादी पहलगाम येथे दुष्कर्म घडवले होते ज्यांला पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली दृढ निश्चय तथा सैनिकाच्या शौर्याने योग्य उत्तर देणे चालू आहे. मात्र या सर्व पार्श्वभूमीवर वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचे मुंदडांनी कळवत आपल्यातली संवेदनशीलता दाखवली.

# परमार्थ आणि विज्ञानाची सांगड घालून केलेले समाजकार्य म्हणजे ईश्वर सेवा होय – सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



रक्तदान ही सेवा सर्वोच्च मानवी सेवा आहे. यामुळे एखाद्या मृत्यू पावणाऱ्या रूग्णाचे प्राण वाचविता येतात, हे प्राण वाचविण्याचे दैवी काम रक्तदाते करीत असतात. परमार्थ आणि विज्ञान यांची परस्पर सांगड घातल्यास आणि त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी केल्यास ही मानवी सेवा ही ईश्वर सेवा केल्यासारखीच आहे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

महाराष्ट्र संतांची भूमी आहे. या भूमीमध्ये सर्व संतांनी मानवी सेवा केल्यास ईश्वरी सेवेचा पुण्य मिळेल असं वारंवार सांगितल आहे. यात संतांच्या वैचारिक मार्गदर्शनानूसार समाजसेवेचा ऐतिहासिक वारसा जपत श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र दिंडोरी प्रणित यांच्यातर्फे भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटक म्हणून बोलताना डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले की, या देशांमध्ये सर्व महापुरूषांनी संत विचारास आत्मसात करून जनतेच्या हितासाठी कार्य केलेले आहे. याच कार्याचा वारसा जोपासत समाजातील ही तरूण पिढी अध्यात्म आणि विज्ञान यांची परस्पर सांगड घालत सेवा करीत आहेत. ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे असे डॉ.इंगोले यांनी सांगितले. श्री स्वामी समर्थ केंद्रातर्फे आयोजित या रक्तदान शिबिराच्या यशस्वितेसाठी सेवेकरी नरसिंग लोमटे, प्रकाश चव्हाण, विनोद कदम, श्रीनिवास रोगे, अशोक महामुने, ज्ञानेश्वर गडदे, सिद्धेश्वर कदम, हाटे, प्रदीप महाळकर, विकास सत्वधर यांनी परिश्रम घेतले.

# नळविहिरा येथे ग्रोव्हिजन गटशेती संघांचे चर्चासत्र संपन्न



प्रतिनिधी @ जाफराबाद

जाफराबाद तालुक्यातील नळविहरा येथे श्री. संजय मोरे पाटील यांचे पाटील कृषी फार्मवर शुक्रवार दि. ९ मे रोजी संपन्न झाले.या खरीप हंगाम पूर्व चर्चासत्रात नैसर्गिक शेती, एस. आर. टी. शेती, दादा लाड कपाशी घन लागवड तंत्रज्ञान, आंबा, सीताफळ व इतर घन फळबाग लागवड, मातीपरिक्षण या विषयी बाबत सामूहिक चर्चा करण्यात आली. यावेळी शिवार फेरीही करण्यात आली. कु. निकिता थुट्टे हिचा सत्कार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण प्रसारक मंडळ पुणे यांनी फेब्रुवारी / मार्च २०२५ मध्ये घेतलेल्या इयत्ता १२ वीच्या परिक्षेत छत्रपती श्री. शिवाजी महाराज नगर परिषद कनिष्ठ महाविद्यालय देऊळगाव राजाची विद्यार्थिनी कु. निकिता बबन थुट्टे ही ७३.८३% गुण घेऊन कला शाखेत महाविद्यालयातून प्रथम आली आहे. त्याबद्दल कु. निकिता थुट्टे हिचा यावेळी ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला.या चर्चासत्र कार्यक्रमास श्री. नंदकिशोर देशमुख, डॉ. गणेश पोटे, श्री. अशोक सोळंके, श्री. संजय मोरे पाटील, सौ. संगीता संजय मोरे पाटील, श्री. बबन थुट्टे, कु. निकिता थुट्टे, सचिन थुट्टे, युवराज मोरे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये अभ्यासासोबत छंद ही जोपासावा;दादासाहेब कसबे

## न्यू इंग्लिश स्कूलचा समर कॅम्प संपन्न

प्रतिनिधी @ अंबाजोगाई



विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये अभ्यासासोबत छंद ही जोपासावा असे प्रतिपादन पत्रकार दादासाहेब कसबे यांनी न्यू इंग्लिश स्कूलच्या समर कॅम्प समारोप प्रसंगी केले.येथील एम.आय.टी. न्यू इंग्लिश स्कूल, गुरुवार पेठ या शाळेत येथे आयोजित समारोपाच्या या कार्यक्रमात प्रमुखपाहुणे दै. अभिमानचे पत्रकार श्री दादासाहेब कसबे ,श्री सरस्वती पब्लिक स्कूलचे उपप्राचार्य शरद बोंदर, अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री महेश भस्मे उपस्थित होते. न्यू इंग्लिश स्कूल, शाळेत समर कॅम्प २०२५ मध्ये विविध शाळेतील ५० विद्यार्थ्यांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यात विविध बौद्धिक खेळासह, अबॅकस, योगा, चित्रकला, स्टोन पेंटिंग, पॉट पेंटिंग, पोहणे, निसर्ग संवर्धन संदेश देणारी रॅली, कथासह अनेक आनंददायी उपक्रम घेण्यात आले.

पुढे बोलताना पत्रकार कसबे म्हणाले की विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनामध्ये अभ्यासासोबत या समर कँम्पमध्ये आवडलेली कला शिकत जोपासावी.एखादा छंद पुढे आपल्याला आनंददायी जीवन जगण्यासाठी व आपला उदरनिर्वाह करण्यासही साह्यभूत ठरु शकतो. या शाळेने आपल्याला विविध खेळ, पेंटिंगसह व्यासपीठावर येवून धैर्याने बोलायला शिकवले हि संधी उपलब्ध करून दिली. आपणास हार्दिक शुभेच्छा...! शरद बोंदर यांनी म्हटले की बालपणा पासून योग केल्याने आपल्या जीवनाला शिस्त लागते त्यामुळे योग आपल्या रोजच्या नित्यामध्ये असावा ,मी लहान असताना पासून सातत्याने योग केल्याने परदेशात लौकिक मिळाला. समारोप प्रसंगी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र तथा भेटवस्तू देण्यात आली. या समर कॅम्पचे नेतृत्व सौ. अनुजा पवार यांनी केले. सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी हा समर कॅम्प यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली. मुख्याध्यापक श्री महेश भस्मे सरांनी पुढील वर्षी यापेक्षा अतिशय जोमाने आनंददायी वातावरणामध्ये समर कॅम्प आयोजित केला जाईल असे आश्वासन दिले. संस्थेचे कार्यकारी संचालक श्री राजेश कराड, प्रशासकीय अधिकारी सौ.शुभांगी ताई कराड, संचालक संगप्पा यांचे मार्गदर्शन यासाठी लाभले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अनुजा पवार तर आभार श्री शेप यांनी मानले केले.


# छायाताई सरोदें अहिल्यादेवी होळकर पुरस्काराने सन्मानित होणार !

प्रतिनिधी @ बीड



शहरातील भाजी मंडई परिसरातील जिव्हाळा बेघर निवारा केंद्रामध्ये गेली तीन वर्षे अनाथ, बेघर, वृद्ध, विकलांग आणि मनोरुग्ण नागरिकांची मायेने सेवा करणाऱ्या छायाताई कचरु सरोदे यांना यंदाचा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

स्व. सिंधुताई सपकाळ यांना आदर्श मानून छायाताई सरोदे यांनी जिव्हाळा केंद्रातील ज्येष्ठ आणि निराधार व्यक्तींची सेवा हेच जीवनकार्य मानले आहे. त्या या वृद्धांचे अंघोळ घालण्यापासून ते त्यांच्या केसांची निगा राखण्यापर्यंतची सर्व कामे ममतेने करतात. तसेच त्या 'अन्नपूर्णा' बनून रोजच्या स्वयंपाकाचे काम आनंदाने सांभाळतात.या सेवाभावी कार्याची दखल घेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी जन्म उत्सव समिती, तरटेवाडी (शिरसमार्ग), काळेवाडी यांनी त्यांची पुरस्कारासाठी निवड केली आहे. दि. १८ मे २०२५, रविवार, सकाळी ११.३० वा. तरटेवाडी (ता. गेवराई, जि. बीड) येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्याचे महसूल मंत्री मा. चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती ज्योतीताई मेटे, आमदार अमित गोरखे, आ .विजयसिंह पंडित, प्रा. लक्ष्मण हाके, माजी मंत्री बदामराव पंडित, माजी आ. लक्ष्मण पवार, बालासाहेब दोडतले, विष्णूदादा देवकते, गणपत काकडे, सरपंच प्रियंकाताई खेडकर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.या पुरस्कार सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कार्यक्रम आयोजकांनी केले आहे. या पुरस्कारा बद्दल सरोदे ताई यांचे दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने अभिनंदन.



बीड - वीर महाराणा प्रताप यांच्या जयंतीनिमित्त पुष्पहार घालून विनम्र अभिवादन करताना नगरपालिकेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे.यावेळी माजी नगरसेवक बाबुराव परळकर यांची उपस्थिती होती.

# अहिल्याबाई होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव समितीचे अध्यक्षपदी रमेश चोरमारे तर सचिव कृष्ण खरात

प्रतिनिधी @ बदनापुर



अहिल्याबाई होळकर ३०० वी त्रिशताब्दी जयंती उत्सव निमित्त शहरातील सावता महाराज मंदिरामध्ये झालेल्या बैठकीत रोशनगावचे काळजीवाहक सरपंच कृष्णा खरात त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील धनगर समाज बांधवांची बैठक झाली. या बैठकीत विपक्ष गटातटातील राजकारण न करता सर्वपक्षीय धनगर समाज बांधवांनी एकत्र येऊन जयंती उत्सव समिती स्थापन करून शहरात भंडाऱ्याचे उधळण करीत दफाच्या ताफ्यावर अहिल्यादेवीची जयंती साजरी करण्याचा निर्णय घेतला.

या जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष रमेश चोरमारे, उपाध्यक्ष राज कोल्हे, सचिव कृष्णा खरात, बाळू वैद्य, सोपान भांड,रवी बकाल बालाजी कानुले,योगेश जोशी संतोष चोरमारे, आप्पासाहेब सोलाट अशोक वैद्य, हरी वैद्य निवृत्ती देहडे, रामनारायण कोल्हे भाऊसाहेब माने ,संतोष खांडेकर माऊली कोरडे ,लक्ष्मण कोल्हे परशुराम जोशी ,विलास जोशी वैजनाथ धनकूरे, भगवान शेळके मच्छिंद्र होळकर ,निखिल वीर रमेश कसबे, दीपक दवणे, संजय बनसोडे, योगेश वीर ,नवनाथ वाघमारे, कृष्णा गायके व कैलास वैद्य यावेळी यांची उपस्थिती लाभली.

# सुकन्या मुंडे यांचे एमपीएससी परीक्षेत यश

प्रतिनिधी @ परळी



परळी तालुक्यातील तळेगाव येथील कन्या कु. सुकन्या कामिणी सुधीर मुंडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परिक्षेत राजपत्रित वर्ग १ सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी या अत्यंत प्रतिष्ठित पदासाठी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

कु. सुकन्या कामिणी सुधीर मुंडे यांचे एसएससी पर्यंतचं शिक्षण जवाहर नवोदय विद्यालय गढी (बीड) येथे झाले तेव्हा पासूनच प्रशासकीय सेवेत जाऊन समाज सेवा करायची ठरवले होते.केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ४ मुख्य परिक्षा दिल्या पन त्यात मुलाखतीसाठी पात्र होऊ शकले नाही. युपीएससीची तयारी करतानाचं सोबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा दिल्या सहा मुख्य परीक्षा आणि दोन मुलाखतीनंतर हे यश प्राप्त करता आले.या सगळ्या श्रेय आपल्या संपूर्ण परिवाराला दिले.

# अहिल्यादेवी होळकरांच्या स्मरणार्थ राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण व्हावे - बाजीराव ढाकणे

प्रतिनिधी @ बीड





महाराष्ट्र राज्यात यावर्षी पुण्यश्लोकअहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी होते आहे.राज्य सरकारनेही त्यांना अभिवादन करण्यासाठी मंत्रिमंडळ बैठक त्यांच्या थेट जन्मस्थळी म्हणजे चौंडी येथे घेतली आहे. या बैठकीतअहिल्यादेवी यांच्या जन्मस्थळी विविध विकास योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे त्याबद्दल राज्य सरकारचे खुप खुप आभार पण एक खंत यानिमित्ताने सरकारने महाराष्ट्र राज्यातील एकल महिला पुनर्वसन हा कार्यक्रम हाती घ्यायला हवाच असे मत साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

अहिल्यादेवी या एकल महिला होत्या.एक एकल महिला किती मोठे कर्तृत्व गाजवू शकते याचे त्यावस्तुपाठ आहेत.एकल महिलां साठी त्या प्रेरक आहेत. तेव्हा त्यांच्या स्मरणार्थ राज्यात एकल महिला पुनर्वसन धोरण व्हावे.

महाराष्ट्रात आजविधवा, परित्यक्ता,घटस्फोटित महिलांची संख्या खूप मोठी आहे.या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी, सरकारने धोरण आखण्यासाठी त्यांची संख्या पुढे येणे आवश्यक आहे.त्यामुळे राज्यातील एकल महिलांचे सर्वेक्षण होणे आवश्यक आहे. अहिल्यादेवी यांचे स्मरणार्थ त्यानुसार धोरण तयार होऊ शकेल.

एकल महिलांची संख्या किती असू शकते ?

देशाच्या २००१ च्या जनगणनेत एकल महिला ५ कोटी तर २०११ साली ७ कोटी ३० लाख होत्या. महाराष्ट्रात आज ही संख्या प्रचंड असू शकते याचा एक पुरावा देत आहे असे साऊ एकल महिला समितीचे बाजीराव ढाकणे यांनी सांगितले. अहिल्यादेवी यांचे जन्मस्थान ज्या अहिल्यानगर जिल्ह्यात आहे.त्या अहिल्यानगर जिल्हा परिषदेने दोन वर्षापूर्वी ग्रामपंचायत स्तरावर एकल महिलांचे सर्वेक्षण केले.तेव्हाफक्त ग्रामपंचायत स्तरावर या एकल महिलांची संख्या १ लाख ७ हजार निघाली.त्यात १५ तालुक्यातील नगर पंचायत,नगरपालिका, महापालिका ही संख्या मिळवली तर ती संख्या २ लाख असू शकते.ही एका जिल्ह्याची स्थिती आहे.जर एकाजिल्ह्यात दोन लाख एकलमहिला असतील तर राज्यात ३६ जिल्ह्यात एकल महिलांची संख्या ७० लाखापेक्षा जास्त असू शकते आणि पुणे, मुंबई,नागपूर,संभाजी नगर सारख्या मोठ्या शहरातील मोठी संख्या बघता एकूण संख्या ८० लाखापेक्षा जास्त असू शकते.त्यांच्यावर अवलंबून असणारी दोन मुले धरली तरराज्याच्या लोकसंख्येत ही खूप लक्षणीय असेल...

कोरोनात महाराष्ट्रात झालेले सर्वात जास्त मृत्यू आणि दारूने गावोगावी मोठ्या संख्येने मरणारे तरुण बघता ही एकल महिलांची संख्या खूप वाढली आहे.त्यामुळे एकल महिलांच्यासाठी धोरण तयार करण्या साठी शासनाने सुरुवात म्हणून राज्यात एकल महिलांचे सर्वेक्षण करून अहिल्यादेवी यांच्या स्मरणार्थ भरीव आर्थिक तरतूद करावी.

हे सर्वेक्षण करण्यासाठी फार खर्च ही येणार नाही.ग्रामपंचायतक्षेत्रात त्या छोट्या गावात ग्रामसेवक,अंगणवाडी सेविका,आशा सेविका यांच्याकडे गावातील एकल महिला माहिती असतेच.ती फक्त वयोगटानुसार संकलन करायची आहे.शहरी भागात वॉर्ड ऑफिसर, अंगणवाडी व स्वयंसेवी संस्था मदत करू शकतील व एकल महिलाना नोंदणीसाठी ऑनलाईन र्ग्यि(अप) बनवून त्या अपद्वारे हि नोंदणी करता येईल.त्यामुळे हा कमी खर्चात होणारा सर्व्हे आहे.आज आपल्या आजुबाजूला असलेल्या या लाखो भगिनी असून ही लक्षात येत नाहीत.अदृश्य असलेला हा प्रश्न संख्या पुढे आली की दृष्यमान होईल व सरकार व समाज यांच्यासाठी नक्कीच काही करू शकेल.त्यामुळे अहिल्यादेवी यांच्या ३०० व्या जयंती निमित्त एकल महिलांच्या प्रश्नावर सर्वेक्षणाची घोषणा सरकारने करून कृति कार्यक्रम जाहीर करावा अशी मागणी साऊ एकल महिला समिती करत आहे तरी राज्य सरकारने तातडीने पुढील कृती आराखडा तयार करावा असे आवाहन बाजीराव ढाकणे यांनी केले आहे.

# एकता फाउंडेशन करणार गुणवंतांचा सन्मान पाथर्डी तालुका शाखेचा अभिनव उपक्रम

**प्रतिनिधी @ अहिल्यानगर**

पाथर्डी शहर व तालुक्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा एकता फाउंडेशन पाथर्डी तालुका शाखेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती तालुका शाखेचे अध्यक्ष कवी राजेंद्र उदारे यांनी दिली. एकताचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष पत्रकार बाळासाहेब कोठुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे असे एकताचे शेवगाव तालुकाध्यक्ष कवी प्रदीप बोडखे यांनी प्रसार माध्यमांना सांगितले. म.सा.प.चे माजी कोषाध्यक्ष तथा ग्रामीण कथाकार प्रा.डॉ.भास्कर बडे, मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा एकता फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक अनंत कराड, सचिव पत्रकार गोकुळ पवार, कोषाध्यक्ष शिवलिंग परळकर, प्रदेश प्रवक्ता मल्हारी खेडकर, जेष्ठ कवी रूपचंद शिदोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर सोहळा नंदकिशोर आयुर्वेदिक औषधालयात संपन्न होणार आहे.

संत तुकडोजी महाराज आदर्श पत्रकार पुरस्कार प्राप्त पत्रकार मा.अविनाश मंत्री, स्व.दादासाहेब रूपवते सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार प्राप्त मा.हाजी हुमायून आतार, संत तुकडोजी महाराज काव्य भूषण पुरस्कार प्राप्त कवी आत्माराम शेवाळे, अंधश्रद्ध निर्मूलन समितीचे नवनिर्वाचित कार्याध्यक्ष मा.शशिकांत गायकवाड, इ.१२वी वाणिज्य शाखा द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थीनी मधुरा रामनाथ बंग या गुणवंतांचा एकता फाउंडेशन च्या वतीने सन्मान करण्यात येणार असून यावेळी शिवव्याख्याते सचिन नागपुरे, अदिनाथ डोमकावळे (अध्यक्ष, पावन गणपती प्रतिष्ठान), माजी नगरसेवक रामनाथ बंग (अध्यक्ष, जेष्ठ नागरिक संघ), कृष्णा रेपाळ (उपाध्यक्ष, एकता फाउंडेशन, पाथर्डी), ह.भ.प.अमोल महाराज सोळसे (कार्याध्यक्ष), सुभाष भागवत (सचिव), योगेश इधाटे (कोषाध्यक्ष), प्रदीप काटे (संघटक), पत्रकार अनिल खाटेर (प्रसिद्धीप्रमुख), कार्यकारिणी सदस्य डॉ.नंदकिशोर औटी, आत्माराम शास्त्री बिडवे, सुखदेव मर्दाने, मेजर नवनाथ तरटे, आनंद पंडागळे, बाळासाहेब चिंतामणी आदी मान्यवर कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

# रायगडात जमावबंदी लागू

## अपर जिल्हादंडाधिकारी यांचे आदेश

**प्रतिनिधी @ गडब**

जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या शिफारशीनुसार आणि अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या आदेशानुसार ९ मे रोजी ००:०१ वाजल्यापासून ते २४ मे रोजी रात्री १२ वाजेपर्यंत जमावबंदी लागू करण्यात आले आहेत. रायगड जिल्ह्यातील खालापूर, खोपोली, रसायनी, रोहा, माणगाव, महाड, नागोठणे, अलिबाग या औद्योगिक भागांमध्ये कामगार संघटनांकडून आंदोलन व संप पुकारले जात असल्याने कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय धार्मिक व जातीय तणावाचे प्रसंग, तसेच आगामी बुद्ध पौर्णिमा (१२ मे), संभाजी महाराज जयंतीवर प्रहार संघटनेचे आंदोलन (१४ मे) आणि पत्रकार फिरोज पिंजार यांचे ठिय्या आंदोलन (१४ मे) यामुळेदेखील अस्थिरता उद्भवण्याची शक्यता लक्षात घेऊन ही अधिसूचना जारी करण्यात आली आहे. जमावबंदीदरम्यान खालील गोष्टींवर बंदी असेल शस्त्र, लाठ्या, सुरे, तलवारी इ. वस्तू बाळगणे, स्फोटक किंवा ज्वलनशील पदार्थ घेऊन फिरणे, दगडफेक किंवा क्षेपणास्त्रे बाळगणे व तयार करणे, प्रतिमा किंवा आकृत्यांचे सार्वजनिक प्रदर्शन करणे, आक्षेपार्ह घोषणा, गाणी किंवा वाद्य वाजविणे, धोकादायक भाषण, हावभाव, चित्रप्रदर्शन पाच किंवा अधिक व्यक्तींचा जमाव परवानगीशिवाय जमविणे.

सूट कोणाला ? शासकीय अधिकारी, शासकीय कर्तव्यावरील कर्मचारी, तसेच शवयात्रा व अंत्यविधीसाठी जमणारा जमाव आणि तहसीलदारांच्या परवानगीने आयोजित कार्यक्रम वगळण्यात आले आहेत. तहसीलदार किंवा कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी परवानगी दिल्यासच कोणताही उत्सव, सभा, मिरवणूक आयोजित करता येणार असून, त्याची जबाबदारी आयोजकांची असेल. पोलीस व जिल्हा प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन केले आहे.


# योगेश्वरी देवी मंदिर ट्रस्टची २०१६ ची घटना रद्द:उच्च न्यायालयाचा मोठा निकाल

## प्रकरण बीडच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे

**प्रतिनिधी @ बीड**

अंबाजोगाईतील ऐतिहासिक आणि श्रद्धास्थान असलेल्या श्री योगेश्वरी देवी मंदिर ट्रस्टसंदर्भातील २०१६ मधील बहुचर्चित घटना आता उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रद्दबातल ठरवली आहे. त्यामुळे हे संपूर्ण प्रकरण आता नव्याने सुनावणीसाठी बीडच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे पाठवण्यात आले असून, हा निकाल न्यायमूर्ती रोहित डब्ल्यू. जोशी यांच्या खंडपीठाने दिला आहे.

योगेश्वरी देवी मंदिर ट्रस्टची स्थापना १९६५ मध्ये एमपीटी अधिनियमांतर्गत करण्यात आली होती. प्रारंभी १९७३ साली ट्रस्टची घटना ठरवण्यात आली होती, मात्र




हरकती नोंदवल्याने ती रद्द झाली. पुढे २००६ मध्ये दोन वेगवेगळ्या घटना दाखल झाल्या. त्या वेळी संबंधित पक्षकारांनी परस्पर सामंजस्य करत एकत्रित घटना तयार करून १९ नोव्हेंबर २०१६ रोजी ती मंजूर करण्यात आली.

मूळ अनुदानधारकाच्या वंशजांचा दावा

१९६५ मध्ये स्थापन झालेल्या ट्रस्टची घटना २०१६ मध्ये सहाय्यक धर्मादाय आयुक्तांनी मंजूर केली होती. मात्र या निर्णयाविरोधात गिरीश, कृष्णा, पृथ्वीराज, योगीराज, धर्मराज आणि राजन पुजारी यांनी न्यायालयात दाद मागितली. त्यांनी दावा केला की, ते नरसुबाई या मूळ अनुदानधारकांच्या वंशज असून त्यांना विश्वस्त व पुजारी म्हणून वंशपरंपरागत अधिकार आहेत.

पुजाऱ्यांना सुनावणीशिवाय वगळले

या वंशजांची बाजू ऐकून न घेताच ट्रस्टची घटना मंजूर करण्यात आली होती, हे न्यायनिष्ठतेच्या तत्वांना विरोधी असल्याचं न्यायालयाने स्पष्ट केलं. परिणामी, १९ नोव्हेंबर २०१६ चा धर्मादाय आयुक्तांचा आदेश आणि २८ फेब्रुवारी २०२३ चा जिल्हा न्यायालयाचा निर्णय रद्द करण्यात आला.

### नव्या निर्णयासाठी ९ महिन्यांची मुदत

प्रकरणाची नव्याने सुनावणी बीडच्या सहाय्यक धर्मादाय आयुक्तांकडे होणार असून, सर्व संबंधित पक्षकारांनी १६ जून २०२५ रोजी सुनावणीस उपस्थित राहावे, असे आदेशात नमूद आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, १६ मार्च २०२६ पर्यंत या प्रकरणात अंतिम निर्णय द्यावा लागेल. तोपर्यंत मंदिर ट्रस्टचे प्रशासन २०१६ च्या घटनानुसार चालवण्यात येईल.

# डोनाल्ड ट्रम्प यांची मोठी घोषणा, व्यापार युद्धाचं संकट कमी होणार, चीनला मोठा दिलासा ?

**प्रतिनिधी @ नवी दिल्ली**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर लादलेलं टॅरिफ ८० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे संकेत दिले आहेत. अमेरिका आणि चीन यांच्यात गेल्या काही दिवसांपासून व्यापारावरील आयात शुल्कावरुन वाद वाढले होते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या



आक्रमक टॅरिफ वॉरच्या धोरणाला चीननं देखील प्रत्युत्तर दिलं होतं. मात्र, चीननं नंतर नरमाईची भूमिका घेत अमेरिकेसोबत चर्चेती तयारी दर्शवली होती. आता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प चीनवरील टॅरिफ ८० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचे संकेत दिले आहेत. यामुळे दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेला व्यापारी तणाव कमी होऊ शकतो.

डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या ट्रुथ सोशल अकाऊंटवरुन चीनवर ८० टक्के टॅरिफ योग्य असल्याचं म्हटलं. मात्र, हे स्कॉट बीवर अवलंबून होते. डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रेजरी सचिव स्कॉट बी यांचा उल्लेख केला. जिनेव्हा मध्ये होणाऱ्या एका बैठकीत चीनसोबत ते चर्चा करणाऱ्या अधिकाऱ्यांपैकी एक आहे. दोन्ही देशांमध्ये निर्माण झालेलं व्यापार युद्ध कमी करण्याच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल आहे.

चीननं त्यांची बाजार पेठ खुली करावी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं की चीननं त्यांचा बाजार अमेरिकेसाठी खुला करावा, हे त्यांच्यासाठी चांगलं असेल. बंद बाजारासोबत आता काम होत नाही. डोनाल्ड ट्रम्प यांच्याकडून चीनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर आयात शुल्क ८० टक्के टॅरिफ हे सध्याच्या १४५ टक्क्यांपेक्षा कमी आहे. गुरुवारी अमेरिका आणि यूके ट्रेड डील झाली, त्यामधील १० टक्के वैश्विक टॅरिफ पेक्षा अधिक आहे. चीन अमेरिका हे मोठे व्यापाराचे भागीदार आहेत. अमेरिकेच्या व्यापार प्रतिनिधी कार्यालयानुसार २०२४ मध्ये अमेरिकेनं चीनला १४३.५ अब्ज डॉलर्स किमतीची निर्यात केली. तर, ४३८.९ अब्ज डॉलर्सची आयात केली.

# परळीत अग्निशामक दलात वाहने ८, प्रशिक्षित कर्मचारी एक

**प्रतिनिधी @ परळी**

विकास कामांच्या नावाखाली परळी शहरात अब्जावधी रुपयांचा चुराडा होत असताना नागरीकांच्या सुरक्षीततेकडे मात्र दुर्लक्ष होताना दिसत आहे. न. प. च्या अग्निशामक दलात लहान मोठी आठ वाहने आहेत परंतु ही वाहने हाताळण्यासाठी विभागप्रमुख वगळता एकही कर्मचारी प्रशिक्षीत नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत एकमेव असलेल्या प्रशिक्षीत कर्मचाऱ्यास कसरत करावी लागत आहे.

दिड लाख लोकसंख्येच्या परळी शहरासह संपूर्ण तालुका व बीड जिल्ह्यातील काही भागात लागलेली आग, पुरस्थिती व इतर आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी परळी नगरपालिकेच्या अग्निशामक दलास पाचारण केले जाते. न. प. च्या अग्निशामक दलात सध्या प्रत्येकी सहा हजार लिटरच्या दोन गाड्या, तीन हजार लिटर क्षमता असलेल्या दोन फोम टाईट गाड्या, दहा किलो क्षमता असलेल्या दोन दुचाकी आणि एक बोट अशी एकूण आठ वाहने आहेत. या वाहनांसाठी चालक व प्रशिक्षीत फायरमन अशा १६ कर्मचाऱ्यांची



आवश्यकता असताना केवळ सुनिल आदोडे हे एकमेव प्रशिक्षीत कर्मचारी असुन ते अग्निशामक दल विभागप्रमुख म्हणुन काम पहातात. सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने आगीच्या घटना सोबत कॅनॉल, तलावात पोहण्यासाठी गेलेल्या व्यक्तींचा मृत्यू होणे अशा घटना सातत्याने घडत आहेत. या परिस्थितीत वाहनांनी सुसज्ज असलेले परळी नगरपालिकेचे अग्निशामक दल आपत्कालीन परिस्थितीत अनेकवेळा कुचकामी ठरत आहे. याकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे.

दोन महिन्यांत सहा घटना उन्हाळा सुरु होताच परळी न.प. अग्निशामक दलाचे आदोडे यांनी अप्रशिक्षित कर्मचारी सोबत घेत दोन महिन्यांत चार मोठ्या व दोन लहान घटनांसह नागापूर येथील वाण धरणात आणि माजलगाव उजव्या कालव्यात बुडालेल्या व्यक्तींचा शोध घेतला.पद भरती आवश्यक आहे आमच्याकडे वाहनांची व साहित्याची कमतरता नाही परंतु यासाठी १६ प्रशिक्षीत कर्मचारी आवश्यक आहेत.यासाठी वरिष्ठांकडे पाठपुरावा केलेला आहे परंतु अद्याप कर्मचार्यांची प्रशिक्षीत भरती झालेली नसल्याने अनेक अडचणी येत आहेत.अशा काळातही आम्ही आपात्कालीन स्थितीत सदैव तत्पर आहोत. - सुनिल आदोडे अग्निशामक विभागप्रमुख,न.प.परळी


# ऊसतोडणी कामगारांचे चारदरी महापंगत देणारे गाव

**प्रतिनिधी @ धारूर**

## जागृत हनुमानामुळे प्रत्येक शनिवारी तीन हजार भाविकांना अन्नदान, रामायण कथा वाचनही होते


ऊसतोडणीसाठी जिल्ह्यात प्रसिद्ध असलेले चारदरी गाव येथील महाकाय वडाच्या झाडाखालील जागृत हनुमानामुळे प्रसिद्धीस आले असून या गावात प्रत्येक शनिवारी महापंगतीतून तीन हजार भाविकांना अन्नदान होत आहे. धारूर, वडवणी, माजलगाव, परळी, बीड यासह जिल्ह्यातील अनेक भाविकांकडून महापंगतीतून अन्नदान दिले जात असल्याने गावात धार्मिकता वाढली आहे. या गावातील ऊसतोड कामगार आता बागायतदार झाला असून रेशीमची शेतीही करत आहेत.

धारूर तालुक्यातील चारदरी हे बालाघाटाच्या डोंगरकुशीतील अडीच हजार लोकसंख्येचे गाव असून मागील वीस वर्षांपूर्वी गावाच्या दक्षिणेस झालेल्या साठवण तलावामुळे गावातील ऊसतोडणी कामगार आता बागायतदार झाले आहे. गावालगत नदीच्या कडेला विशाल वडाच्या झाडालगत हनुमानाची मूर्ती दगडी ओट्यावर असून नवसाला पावणारा हनुमान म्हणून ओळख आहे. गावकऱ्यांची हनुमानाचे मंदिर लोकवर्गणीतून बांधण्याची इच्छा आहे.



परंतु सदरील हनुमानाचे मंदिर गोदावरी नदीच्या पाण्याने एका रात्रीतून बांधले जावे अशी जुनी आख्यायिका असल्याने या गावात हनुमानाचे मंदिर बांधले गेले नाही. गावातील तलावाचे बांधकाम करताना गुत्तेदारास अनेक अडचणी येत होत्या. परंतु गुत्तेदाराने हनुमानाच्या मूर्ती परिसरात लहान सभामंडप बांधल्याने अडचणी थांबल्या असे गावकरी सांगतात. पिंपळाच्या झाडाच्या बुंध्यालगत हनुमानाची मूर्ती असून काही वर्षांपूर्वी हे झाड वाळले असून आता केवळ खोड शिल्लक आहे. या गावात आठवड्यातील प्रत्येक शनिवारी रामायणाची कथा सांगण्यात येते. नंतर गावात भाविकांसाठी महापंगत होते. प्रत्येक शनिवारी एका पंगतीसाठी तीन हजार भाविक हजेरी लावतात. या गावात जर पंगत द्यायची असेल तर पुढील ६ महिने भाविकांना प्रतीक्षेत थांबावे लागते. एका भाविकाला एक पंगत द्यायची असेल तर किमान एक लाखाचा खर्च येतो.

चारदरी गावात रेशीम उत्पादन मागील तीन-चार वर्षांत पाण्याची उपलब्धता असल्याने चारदरी गावातील शेतकरी रेशीम शेतीकडे वळले आहेत. रेशीम कोष निर्मितीतून चांगले उत्पन्न शेतकऱ्यांना मिळू लागले आहे .रेशीम कोष निर्मितीसाठी शेडचीही निर्मिती मोठ्या प्रमाणात या गावात झाली आहे.



# परभणीत स्विमिंग पूलमध्ये बुडुन ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू; ३ तासानंतर मृतदेह शोधण्यास यश

**प्रतिनिधी @ परभणी**

शहरातील एका जलतरणीकेत बुडून ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना आज परभणीत घडली आहे. शहरातील मोहमदिया मशीद परिसरात राहणारे असलम खान हे दररोजच्या प्रमाणे आपल्या मित्रांसमवेत जलतरणीकेत पोहण्यासाठी आले होते. मात्र, काही वेळाने ते दिसेनासे झाले, त्यामुळे मित्रांनी त्यांना शोधायला सुरुवात केली तब्बल ३ तास जलतरणीकेतील कर्मचाऱ्यांनी शोधल्यानंतर त्यांचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आला. दरम्यान परभणी महानगरपालिकेने ही जलतरणीका खासगी तत्वावर चालवण्यास दिली आहे, काही वर्षांपूर्वी असाच एका तरुणाचा मृत्यू येथे झाला होता. त्यानंतर पुन्हा एकदा तशीच घटना घडल्याने येथे पोहण्यासाठी, सरावासाठी येणाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

उन्हाळा सुरू असल्याने सध्या नदी, तलाव, स्विमिंग पूल आणि इतर ठिकाणी पोहोण्यासाठी नागरिक गर्दी करताना दिसून येतात. मात्र, सुरक्षेच्या अभावाशिवाय पोहण्यास उतरणे जीवावर बेतू शकते. विशेष म्हणजे महापालिकेच्या जलतरणीकेतून बुडून एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याने तेथील सुरक्षेवर प्रश्न निर्माण झाले आहे. पाण्यात उतरणाऱ्या व्यक्तींना सेफ जॅकेट का दिले जात नाही, त्यांच्या सुरक्षेसाठी सेफ गार्ड जलतरण परिसरात का नव्हते, असे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे, जलतरणीकेचा ठेका घेतलेल्या संबंधित ठेकेदारावर कारवाई होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

## मराठवाडा अर्बन को.ऑप. सो. लि. बीड यांना कर्जापोटी दिलेला

# धनादेश न वटल्याने कर्जदारास बारा महिने कैद व दंडाची शिक्षा-ॲड. रविंद्र वाघमारे

प्रतिनिधी । बीड

बीड येथील जयनाथ एकनाथ धांडे यांनी मराठवाडा अर्बन को.ऑप. क्रे. सोसा.लि. बीड यांचेकडून कर्ज घेतले होते व सदर कर्जाचे हप्त्या पोटी जयनाथ एकनाथ धांडे यांनी वरील संस्थेस धनादेश दिला होता, परंतू खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने सदर धनादेश न वटता परत आला त्यामुळे वरील संस्थेने आरोपी जयनाथ एकनाथ धांडे याचे विरुध्द कलम १३८ एन. आय. क्ट प्रमाणे प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणात मराठवाडा अर्बन को. ऑप. क्रे. सोसा.लि. बीड च्या वतीने प्राधिकृत अधिकारी जालिंदर उत्तम गवळी तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजी भगवानराव देसाई यांनी दिलेली साक्ष व दाखल केलेली कागदपत्रे यांचा विचार करून, मा.५ वे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, बीड यांनी कर्जदार/आरोपी जयनाथ एकनाथ धांडे, रा. गणेश नगर, बीड यास १२ महिने कैदेची शिक्षा व नुकसान भरपाई



पोटी रु.२,१०,२५०/- फिर्यादी संस्थेस देण्याचा आदेश केलेला आहे. दंडाची रक्कम ३० दिवसांत न भरल्यास अतिरीक्त ६ महिने कैदेची शिक्षा देण्या बाबत आदेश केलेला आहे. सदर प्रकरणात फिर्यादी बँके तर्फे ड. रविंद्र एस. वाघमारे यांनी काम पाहिले, त्यांना संस्थेचे विधी सल्लागार डी. एम. डबडे यांनी मार्गदर्शन केले. मा. न्यायालयाचे वरील निकालामुळे संस्थेचे थकीत कर्जदार यांचेत खळबळ उडाली आहे.



गेवराई : भाजपाचे ज्येष्ठ नेते शेख जमादार साहेब यांची तब्येतीची विचारपूस करण्याकरता भाजपाच्या उपाध्यक्ष दबंग,माजी खासदार डॉ प्रितम ताई मुंडे आल्या असता त्यांचा सत्कार करताना भाजपा संस्थापक सदस्य नोटरी ड राहुलकुमार राका, खळेगाव येथील माजी प.स.उपसभापती अशोकराव शिंदे, भाजपा युवा नेते डॉ शेख ईब्राहिम , महेश नागरे, बाबासाहेब घोडके , विनोद राठोड आदि भाजपा कार्यकर्ते दिसत आहेत .

# वलांडीत जूगार अड्यावर धाड; एका विरोधात गून्हा दाखल

प्रतिनिधी । देवणी

देवणी तालुक्यातील वलांडी येथील बस स्टॉप परीसरामागील पत्र्याच्या शेडमध्ये मटका जूगार अड्यावर धाड देवणी पोलीसांत ६ मे रोजी एका विरूद्ध गून्हा दाखल. अधिक माहिती अशी की, वलांडी बस स्टॉप मागील पत्र्याच्या शेड मधे आरोपीने नागरीकांकडून पैसे घेऊन संगणकावर स्कील ॲन्ड माईन्ड गेम ऑनलाईन मटका जूगार खेळवत व खेळवित आहे अशी गूपीत माहीती मिळताच देवणी पोलीसांनी जूगार अड्यावर छापा मारून साहीत्य व रोख रक्कम १८५७० रू मूद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पोलीस उपनिरीक्षक गोपाळ वऱ्हाडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी चंद्रशेखर मूंजाळ रा वलांडी यांच्या विरोधात महाराष्ट्र जूगार कायद्याअंतर्गत गून्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गौंड हे करीत आहेत.



प्रतिनिधी । जिंतुर

रात्री गंगामसल्यात गोदावरीच्या काठी मुकामी होतोत । कृष्णा महाराज सोळंके मोरेश्वर मंदिराच्या परिसरात संस्कार शिबिर घेतात । शिबिर मोफत असतं. गावातील मंडळी शुद्ध पाण्याची, दोन टाईम जेवणाची व्यवस्था करतात. मुलं उन्हात न फिरता टीव्ही मोबाईल सोडून या निसर्गरम्य परिसरात येतात. तब्बल ७०- ८० मुले या शिबिराला २१ दिवस हजर होती. कृष्णा महाराज मुलांना संतांचे विचार आणि निसर्गाच्या सानिध्यात जगण्याचे धडे देतात. डॉक्टर अभिजीत यांच्याकडून या ठिकाणी व्यवस्था झाली. गंगेच्या पात्रातील पुरातन मोरेश्वराचे मंदिर । पाण्याच्या थेंबाविना गोदावरीचे पात्र. बेसॉल्ट दगडाचे वेगवेगळे नमुने. काळी खाप माती । गोदावरी वर आधारभूत शेती । परिसर बऱ्यापैकी. मुलांसोबत मुक्काम झाला । लाल हादगा । समिंदर सोक । बहावाच्या बिया मुलांना वाटप केल्या । मुलांची वेगवेगळे प्रश्न ऐकून आनंद झाला । नक्कीच ही मुलं यातली एक न एक बी लावतील याची खात्री आहे.



जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा,आ,श्री. अमरसिंह पंडित साहेब व आमदार श्री विजसिंह पंडित यांनी मुस्लिम समाजासाठी अत्यंत पवित्र असलेल्या हज यात्रे करिता निघालेल्या गेवराई तालुक्यातील यात्रेकरूंना आज गेवराई शहरातील मदरसा अल - हसनैन येथे मुफ्ती गयास साहेब यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमात सहभागी होऊन हज यात्रेकरूंना शुभेच्छा दिल्या.यावेळी सरवरखान पठाण, वसिम फारुकी, आवेज शरीफ, शेख खाजा मामू यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

# विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची २१ मे रोजी बैठक

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

विभागीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची २१ मे रोजी दुपारी ०२.०० वाजता विभागीय आयुक्त कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली असून विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर तथा अध्यक्ष, विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समिती यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक होणार असल्याचे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे सदस्य सचिव तथा उपायुक्त (महसूल) यांनी कळविले आहे.

विलंब, गैरव्यवहार, अकार्यक्षमता व इतर कारणाने होणाऱ्या भ्रष्टाचाराबाबत जनतेच्या तक्रारी तसेच गाऱ्हाणी समितीकडून ऐकून घेण्यात येत असून लेखी स्वरूपातील तक्रारी स्विकारण्यात येतात. विशिष्ट अभिकथनाबाबत स्वतंत्र्यपणे स्थानिक चौकशी करण्याच्या दृष्टीने तजवीज करण्यात आली आहे.



बीड - वीरशिरोमनी महाराणा प्रताप यांच्या जयंती निमित्त राजपुत समाज बांधवांच्या वतीने अभिवादन कार्यक्रमास सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण काका आखाडे व शिवसेना जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांनी उपस्थित राहून अभिवादन केले. यावेळी झुंजार धांडे,डॉ.राजीव काळे,सुरेश तात्या शेटे,मुकूंद भालेकर,किशोर राऊत,मधुकर धांडे, संध्याताई राजपूत,मीराताई गांधले,आयोजक जयसिंग चुगडे, विक्रांत हजारे,राणा चव्हाण,प्रकाशसिंग ठाकूर,रतन गुजर,विक्रमसिंग कपूर यांच्या सह रजपूत समाज बांधव व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घरात घुसून छेड काढल्याच्या आरोपातून लाईनमन गजानन धुमाळ यांची निर्दोष मुक्तता

माजलगाव (प्रतिनिधी)

शहरातील पाटील गल्ली येथे कार्यरत असलेले तात्कालिन लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात दि.१७ एफ्रील २०१८च्या रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास शहरातील पाटील गल्ली भागातील घरात घुसून महीलेची छेड काढुन, शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबतची तक्रार पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे दि.२५ एप्रिल २०१८ रोजी दाखल झाली होती.सदर तक्रारीवरून तपासी अंमलदार डी.ए.सरवदे यांनी तपास केला व तपासानंतर आरोपी विरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले व त्यामध्ये फिर्यादी,साक्षीदार, तपासी अंमलदार यांचे जबाब नोंदवल्यानंतर आरोपीचे विधीज्ञ ड.नारायण गोले यांनी प्रकरणात अंतिम युक्तिवाद केल्यानंतर दि.८ मे रोजी आरोपी लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांची माजलगाव येथील चौथे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्री एम. ए.कुलकर्णी साहेब यांनी सबळ पुराव्याअभावी आरोपी निर्दोष मुक्तता केली.

प्रकरणी हकिकत अशी की, शहरातील पाटील गल्ली भागातील तात्कालीन लाईनमन गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात दि.१७ एफ्रील २०१८च्या रात्री १०:३० वाजण्याच्या सुमारास शहरातील पाटील गल्ली भागात राहणाऱ्या एका महिलेची घरात घुसून छेड काढुण,शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिल्या बाबतची तक्रार पोलीस स्टेशन माजलगाव शहर येथे दि.२५ एप्रिल २०१८ रोजी दाखल झाली होती,सदर फिर्यादी वरुन आरोपी गजानन नारायण धुमाळ यांच्या विरोधात गु.र.न.१२७/२०१८ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ४५२,३५४,५०४,५०६ प्रमाणे नोंदवण्यात आला होता,प्रकरणात तपासी अंमलदार डी.के.सरवदे यांनी प्रकरणात साक्षीदार यांचे जबाब नोंदवून व तपास करुन आरोपी विरुद्ध आरोपपत्र दाखल केले,त्यानंतर प्रकरणात फिर्यादी,तपासी अंमलदार व इतर साक्षीदार यांचे जबाबानंतर चौथे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी श्री एम.ए.कुलकर्णी साहेब यांच्या समोर आरोपीचे विधिज्ञ ड.नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर माजलगाव येथील चौथे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब,श्री एम.ए.कुलकर्णी साहेब यांनी दि.८मे रोजी सबळ पुराव्याअभावी आरोपी गजानन नारायण धुमाळ यांची निर्दोष मुक्तता केली.

# नांदेड ते परळी रेल्वेमार्गावर विभागीय रेल्वे व्यवस्थापकांचा तपासणी दौरा

प्रतिनिधी @ परळी

दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम) प्रदीप कामले यांनी शुक्रवार दि ०९ मे रोजी नांदेड विभागातील नांदेड ते परळी रेल्वेमार्गावर तपासणी दौरा केला. या दौऱ्यात विविध पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला आणि भविष्यातील सुरक्षा व कार्यक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.नांदेड ते परळी दरम्यान रेल्वेमार्गावर तपासणी खिडकीतून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक अशा विविध संरचना, वळणे, ब्रिजेस व सिग्नल यांची बारकाईने पाहणी करण्यात आली.

परभणी आणि गंगाखेड रेल्वे स्थानकांचा विकास अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत करण्यात येत आहे. या रेल्वे स्थानकावरील पुनर्विकास कार्याचा आढावा घेतला आणि उपस्थित अधिकार्यांना सूचना केल्या .परळी ते वडगाव निळा स्थानकांदरम्यान दरम्यान लेव्हल क्रॉसिंग गेट क्र. २४- , गंगाखेड-पोखरणी नरसिम्हा स्थानकांदरम्यान पूल क्र. २८ आणि



वडगाव निळा - गंगाखेड जवळील वळण क्र. १७ आणि गंगाखेड स्टेशनयार्ड आशा संरचनांची तपासणी करून त्यांची सध्याची स्थिती आणि देखभाल कार्यांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

डीआरएम प्रदीप कामले यांनी गंगाखेड रेल्वे स्टेशन येथील रिले रूम आणि स्टेशन विकास कार्याची पाहणी केली. तसेच वडगाव निळा रेल्वे स्थानकाची तपासणी केली ज्यात त्यांनी तेथील रिले रूम, ट्रेक्शन सब स्टेशन यांची पाहणी केली. या दौऱ्यात पी. सी. रुद्र मूर्ति (वरिष्ठ विभागीय अभियंता), पी. सुरेश, (वरिष्ठ विभागीय सिग्नल आणि टेलिकॉम अभियंता), निमजे (उप मुख्य अभियंता/गतीशक्ती /नांदेड)/, ए. रवी तेजा (वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरएसओ),सोभन बाबू (विभागीय विद्युत अभियंता/टीआरडी), श्रीनिवास सूर्यवंशी ९सहायक वाणिज्य अधिकारी), गिरीश कुमार (सहायक सिग्नल आणि टेलिकॉम अभियंता) हे विभागीय अधिकारी प्रदीप कामले यांच्यासोबत उपस्थित होते.

# भारतीय सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानच्या सन्मानासाठी रक्तदान शिबीराचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर ' च्या माध्यमातून पाकिस्तानी दहशतवाद्या विरोधात केलेल्या धाडसी कारवाई नंतर पाकिस्तानी लष्कराने हल्ल्याची सुरुवात केली आहे. यामध्ये कर्तव्यावर असणाने काही भारतीय सैनिक शाहिद झाले आहेत. भारती सैनिकांच्या शौर्य आणि बलिदानच्या सन्मानासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले आहे.

ऑपरेशन सिंदूर मुळे पाकिस्तान ची जगभरात नाचक्की झाली आहे. पाकिस्तान ने बुधवार पासून भारता विरोधात कारवाया चालु केल्या आहेत. पाकिस्तान चा प्रत्येक नापाकप्रयत्न भारतीय लष्कर परतवून लावत आहे. यात काही निष्पाप भारतीय नागरिकांचा व लष्करी सैनकांचा बळी गेला आहे. भारती जावनांचा उत्साह वाढवण्यासाठी, या शाहिद जवानाप्रती सहानभूती असणाऱ्या, देशाप्रती स्वाभिमान असणाऱ्यांनी या रकदान शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख उल्लास गिराम यांनी केले आहे.

सदरील रक्तदान १० मे शनिवार



रोजी सकाळी ११ वाजता घेण्यास सुरुवात होईल. बीड बस्थानकमागे असणारे शिवसेनेचे जिल्हा संपर्क कार्यालय या ठिकाणी हे शिबीर आयोजित केले आहे. बीड शहरातील सुजान नागरिकांनी, तरुण युवक - युवतीनी, देशाभिमान असणाऱ्यांनी, शिवसैनिकांनी या शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करून भारतीय लष्करी सैनिकांना प्रोत्साहन द्यावायचे आहे.

# शौर्याची अमर कहाणी : वीर जवान सचिन वनंजे यांना लष्करी इतमामात अखेरचा निरोप

## वीर जवान अमर रहें' च्या घोषात देगलूररानी अश्रूंनी भरलेला निरोप दिला लाखो नागरिकांचा सहभाग

देगलूर (प्रतिनिधी)

तमलूर (ता. देगलूर) येथील सुपुत्र व सध्या फुले नगर, देगलूर येथे राहणारे वीर जवान सचिन यादवराव वनंजे यांना जम्मू-काश्मीरमध्ये देशसेवेचा शर्थीचा निभाव करत असताना ६ मे रोजी सैनिकी वाहन दरीत कोसळल्याने वीरमरण आले. या घटनेनंतर त्यांचे पार्थिव अनेक अडथळ्यांवर मात करत ९ मे रोजी देगलूरमध्ये पोहोचले आणि लष्करी इतमामात त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.

रात्रभर प्रवास करत हैदराबादमार्गे देगलूरला पार्थिव आणण्यात आले. सकाळी ८.३० वाजता त्यांच्या राहत्या घरी अंत्यदर्शनासाठी ठेवले असताना संपूर्ण परिसर अश्रुपूर झाला. कुटुंबीयांचा आक्रोश, नातेवाईकांचा शोक आणि नागरिकांचा अभिमान अशा वातावरणात त्यांची अंत्ययात्रा निघाली.फुलांनी सजवलेल्या लष्करी गाडीतून शहरात फिरवण्यात आलेल्या चित्ररथात नागरिकांनी रांगोळ्या घालून, पुष्पवृष्टी करून, 'भारत माता की जय', 'वीर जवान अमर रहें'



अशा घोषणांनी त्यांना वीर निरोप दिला. शिवाजी चौक, अण्णाभाऊ साठे चौक, गांधी चौक, बसवेश्वर चौक, जामा मस्जिद, बौद्ध विहार, अमरदीप चौक आदी मार्गांनी अंत्ययात्रा नगर परिषदेच्या शेजारील मैदानात पोहोचली.

लष्करी सन्मान व उपस्थित मान्यवरांची श्रद्धांजली

शहीद सचिन वनंजे यांना लष्कर आणि पोलिस दलाकडून तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. हजारो नागरिकांच्या साक्षीने अंतिम संस्कार पार पडले. या भावूक क्षणी संपूर्ण शहर एकवटले होते.

उपस्थित मान्यवर

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, नांदेड पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार भरत सूर्यवंशी, नगरपालिकेचे सीईओ नीलम कांबळे, पोलिस निरीक्षक मारुती मुंडे, लष्करी अधिकारी कॅप्टन वीरेंद्र माका, बालाजी पाटील खतगावकर, खासदार रवींद्र चव्हाण, आमदार जितेश अंतापुरकर, आमदार प्रतापराव चिखलीकर, रामदास पाटील सोमठाणकर, माजी आमदार सुभाष साबणे, सुरेशदादा गायकवाड, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, लक्ष्मीकांत पदमवार, महेश पाटील, भावनाताई दाशेटवार, कैलास येजगे, धनाजी जोशी, सुशीलकुमार देगलूरकर, अशोक कांबळे आदींसह विविध पक्षांचे पदाधिकारी आणि हजारो नागरिकांनी उपस्थित राहून श्रद्धांजली वाहिली.देशासाठी शहीद होणं ही सर्वोच्च वीरता असते. वीर जवान सचिन वनंजे यांचं बलिदान देगलूरच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी गौरवाचं प्रतीक ठरलं आहे. अशा अमर जवानास कोटी कोटी नमन.


# बालाजी फिल्डवेल सोसायटी लि.पेठवडज ला राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर

**अशोकराव डावकोरे व सौ.सुनिता डावकोरे यांना लोकरत्न पुरस्कार जाहीर होताच सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव सुरु**

नांदेड

लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या संस्थांना व व्यक्तींना राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.या कार्यक्रमासाठी माननीय महामहीम राज्यपाल हरिभाऊ नाना बागडे , राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा. संजयजी शिरसाठ, कॅबीनेटमंत्री अतुलजी सावे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे,

मा. पालकमंत्री तथा मंत्री खासदार सांदिपानजी भुमरे पाटील, माजी खा. इम्तियाज जलील, आ. प्रदीप जैस्वाल,आ. संदीप क्षीरसागर,आ. प्रशांत बंब,राष्ट्रसंत रामगिरीजी महाराज, मराठवाड्यातील आय ए. एस./ आय पी एस अधिकारी यांचीही उपस्थिती राहणार आहे. हा लोकरत्न पुरस्कार सोहळा संभाजीनगर येथील संत एकनाथ रंगमंदिर याठिकाणी जून महिन्यात होणार आहे. या लोकरत्न पुरस्कार सोहळ्यात श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि. पेठवडज ता.कंधार जि.नांदेड या सोसायटीला पुरस्कार जाहीर झाला असून सोसायटीच्या सर्वेसर्वा सौ.सुनिता अशोकराव डावकोरे अध्यक्षा व श्री अशोकराव श्यामराव डावकोरे साहेब तांत्रिक सल्लागार यांना त्यांच्या कार्याची दखल घेऊन लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे लोकरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या माध्यमातून अशोकराव डावकोरे साहेब यांनी पेठवडज गावात अनेक उपक्रम राबवित असतात.शेतकरी बांधवांना नांगरटी साठी अर्ध्या किमतीत ट्रॅक्टरने नांगरणी, लग्न असेल तर कन्या दान म्हणून आर्थिक मदत, रस्ता बनवून दिला जातो, फिल्टर पाणी घरपोच मोफत सेवा, गावातील गरीब नागरिकांसाठी



अंत्यविधीसाठी आर्थिक मदत दिली जाते,पहिली ते बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन प्रोत्साहन दिले जाते.असे एक नाही अनेक उपक्रम सोसायटीच्या माध्यमातून राबवित असतात. श्री.अशोकराव डावकोरे व सौ.सुनिता डावकोरे हे पती पत्नी पेठवडज गावाची जनसेवा हीच ईश्वरसेवा म्हणून सेवा करतात. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीचे सर्वेसर्वा म्हणून सौ.सुनिता अशोकराव डावकोरे व श्री अशोकराव श्यामराव डावकोरे साहेब यांना लोकरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

लोकशाही पत्रकार संघाचा लोकरत्न पुरस्कार जाहीर केल्याबद्दल निवड पत्र देताना संस्थापक अध्यक्ष बीबी वैद्य, (संपादक दैनिक युवती राज ) राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, प्रभाकर पांडे प्रदेश उपाध्यक्ष, बाजीराव पाटील गायकवाड दैनिक लोकनेता मराठवाडा विभागीय संपादक तथा लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य विभागीय सचिव, इस्माईल महेबुब शेख लातूर जिल्हा उपाध्यक्ष तथा दैनिक लोकनेता विभागीय उपसंपादक,गोविंद मोरे जिल्हा अध्यक्ष लोकशाही पत्रकार संघ नांदेड, सरपंच तथा पत्रकार संतोष पाटील जाधव पिंपळदरीकर यांनी राज्यस्तरीय लोकरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले असून सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# जिजाबाई गायकवाड यांच्या रक्षेतून वृक्ष लागवड –पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश

बिलाल कुरेशी

कळंब तालुक्यातील भाटशिरपुरा गावातील जेष्ठ नागरिक जिजाबाई लिंबराज आबा गायकवाड यांचे दिनांक ५ मे रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मात्र त्यांच्या कुटुंबियांनी पारंपरिक विधींना एका सकारात्मक वळणावर नेत, समाजासमोर एक प्रेरणादायी उदाहरण ठेवले आहे.

जिजाबाई यांच्या रक्षेचे पारंपरिक नदी विसर्जन न करता, त्यांच्या कुटुंबियांनी रक्षेतून वृक्षांची लागवड केली. राखेचा उपयोग खत म्हणून करत विविध प्रकारची झाडे लावण्यात आली. मृत्यूच्या दुःखद प्रसंगालाही त्यांनी जीवनदायिनी हरित चळवळीचे स्वरूप दिले.

हे वृक्ष आता केवळ जिजाबाईंच्या स्मृतीरूपात उभे राहत नाहीत, तर पर्यावरण संवर्धनाचा एक सशक्त संदेशही देत आहेत.

आजच्या काळात जिथे प्रदूषण आणि वृक्षतोडीची समस्या गंभीर बनत आहे, तिथे गायकवाड कुटुंबियांचा हा निर्णय एक आदर्श सामाजिक संदेश देतो – मृत्यूनंतरही निसर्गासाठी काहीतरी चांगले करून जाता येते.या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, अनेकांनी ही संकल्पना आत्मसात करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.जिजाबाई गायकवाड यांच्या स्मृतिप्रित्यर्थ लावलेले हे वृक्ष भविष्यात हरित श्रद्धांजलीचे प्रतीक ठरतील, यात शंका नाही.या अनोख्या उपक्रमासाठी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक अतुल गायकवाड व त्यांच्या कुटुंबियांनी उचललेल्या या पावलाचे सर्वत्र स्वागत होत आहे

# शहरातील हातपंप इलेक्ट्रॉनिक पंप तत्काळ दुरुस्त करा

बीड शहरात पाण्याची तीव्र त्यांच्याही निर्माण झाली असून नागरिकाची पाण्यासाठी भटकंती सुरू आहे यावर मत करण्यासाठी हात पंप व इलेक्ट्रॉनिक पंप तत्काळ दुरुस्त करावेत अशी मागणी बीड जिल्हा काँग्रेस कमिटी अल्पसंख्यांक विभागाचे माजी शहराध्यक्ष मोहम्मद खमरोदिन यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकारी यांच्याकडे केली आहे मुख्य अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात मोहम्मद खमरोद्दीन यांनी म्हटले आहे की सध्या बीड शहरात मध्ये प्रमाणात पाणी टंचाई असून पाणी पुरवठा २० ते२५ दिवसा आड व कमी दबाने होत आहे उन्हाची तीव्रता दिवसे दिवस वाढत चालली असून पाण्याची टंचाई निर्माण होऊ लागल्याने महिलांना ठिकठिकाणी पाण्यासाठी भटकती करावी लागत आहे हेच वास्तव समोर ठेवून शहरातील हात पंप व इलेक्ट्रॉनिक पंप हे मोठ्या प्रमाणात नादुरुस्त आहेत ते बंद असल्याने नागरिकाच्या अडचणी अधिक भर पडली आहे न प प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी अर्ज निवेदने देऊन ही हात पंप दुरुस्त करण्यास अनास्था दिसून येत आहे बीड शहरातील नागरिकांना महिनाभरापासून नळाला पाणी आलेले नसल्याने नागरिका वर पाणी पाणी करण्याची वेळ आली या बाबीकडे न प प्रशासन गंभीर्याने पाहायला तयार नाही नगर परिषदेच्या मुख्य अधिकारी प्रशासक यांनी लक्ष घालून शहरातील बंद असलेले हात पंप इलेक्ट्रॉनिक पंप त्वरित दुरुस्त करावेत व नागरिकाची पाण्यासाठी होणारी वन वन वाचवावी असे मोहम्मद खमरोदीन यांनी म्हटले आहे



# नांदा ग्रामपंचायतच्या ग्रामविकास अधिकारी माहिती देण्यास उदासीन

आष्टी/प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील नांदा ग्रामपंचायतच्या ग्रामविकास अधिकारी यांचे गावातील ग्रामस्थाकडे लक्ष नाही .नांदा गावांमध्ये सार्वजनिक शौचालय नाही महिलांना उघड्यावर शौचालायला जावे लागते गावांमध्ये जाताना मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत आहे.नांदा गावांमध्ये कोणत्याही शासकिय सुविधा नाहीत ग्रामविकास अधिकारी यांना शासकिय मानधन मिळते परंतु ग्रामस्थांचे कोणतेही कामे वेळेवर पुर्ण होत नाहीत.ग्रामस्थांना वेळेवर कोणतेही कागदपत्रे मिळत नाहीत.सरकारने प्रधानमंत्री आवास योजना घरकुल राबवली आहे.परंतु ग्रामविकास अधिकारी सतत गैरहजर आसल्यामुळे कोणाचे घरकुल यादीत नावे आले हे कळत नाही .गांवामध्ये मासिक ग्राम सभा होत नाही ग्रामस्थांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम हे ग्रामविकास अधिकारी यांचे आहे परंतु ग्रामविकास अधिकारी गावांमध्ये येत नसल्याने प्रश्न मार्गी लावणार कोण असा सवाल ग्रामस्थ करत आहे?गांवामध्ये पाणी वेळेवर येत नाही.गांवामध्ये कचरा कुंडी नाही घनकचरा गावातील जनतेनी टाकायचा कुठे कचराकुंडी नसल्याने गांवामध्ये घाणीचे साम्राज्य. शासनाकडुन १५व्या वित्त आयोगामार्फत ग्रामपंचायतला मोठ्या प्रमाणात निधी येतो तो जातो कुठे? भारत स्वातंत्र्य होऊन७५वर्ष झाले आहेत पण ग्रामपंचायतला गावांमध्ये अद्यापही जागा उपलब्ध नाही. तलाठी कार्यालय इमारतीत ग्रामपंचायत कार्यालय आहे. ग्रामपंचायतला खिडकी आहे परंतु दरवाजे नाहीत खिडकी तोंडुन शासकीय कागदपत्रे जर चोरीला गेले तर यांना जबाबदार कोण?याला जबाबदार कार्य दक्ष ग्रामविकास अधिकारी या जबाबदार राहतील का? कारण त्या गांवात येत नाही ग्रामस्थांमध्ये अशी चर्चा आहे.ग्रामविकास अधिकारी सांगतात १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतुन माझ्या कालावधीत कोणतेही कामे झाली नाहीत मग हा निधी कोणाच्या घशात गेला. नांदा गावची लोकसंख्या ही ५००ते६००आहे या गावासाठी आलेला निधी गावातील विकासासाठी आहे.गांवाच्या विकासासाठी ग्रामविकास अधिकारी यांनी दाखवून द्यावे की मी हा विकास केला. ग्रामविकास अधिकारी आपली काही कारणे दाखवत हजर नसतात त्या सतत गैरहजर असतात त्यामुळे गावचा विकास होणार कसा असा सवाल नांदा गांवातील ग्रामस्थ करत आहे.

# घाटगे पाटलांचे आंदोलन यशस्वी

## तळणेवाडी नंतर गुळज सीआर गेट मधून शहागड बंधाऱ्यात सोडले पाणी

अंबड (प्रतिनिधी)

भारतीय जनता पक्षाचे नेते सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांच्या पाणीप्रश्नासाठी केलेले आंदोलन अखेर यशस्वी ठरले. जायकवाडी पाटबंधारे विभागाकडे केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि घेतलेली आक्रमक भूमिका यामुळे पाटबंधारे विभागाला नमावे लागले असून तळणेवाडी सीआर गेटमधून पाणी सोडल्यानंतर आता गुळज सीआर गेट मधूनही शुक्रवारी शहागड बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले. या निर्णयामुळे बळेगाव, आपेगाव, भाम्बेरी, दह्याला, साष्ट पिंपळगाव सह गोदाकाठच्या अन्य गावातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.




मागील काही काळापासून गोदाकाठ परिसरातील शेतकरी पाण्याची मागणी करत होते. पिकांना पाण्याची नितांत गरज असतानाही पाणी मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. या पार्श्वभूमीवर, सतीश घाटगे यांनी शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत आंदोलनाचा मार्ग अवलंबला होता. तसेच, जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क साधून वस्तुस्थिती मांडली होती आणि तातडीने पाणी सोडण्याची मागणी केली होती.

अखेरीस, या प्रयत्नांना यश आले असून, शुक्रवारी सायंकाळी गुळज सीआर गेटमधून शहागड बंधाऱ्यात पाणी सोडण्यात आले. यामुळे परिसरातील ऊस, फळबागा आणि इतर पिकांना जीवदान मिळणार आहे. गोदाकाठच्या शेतकऱ्यांनी सतीश घाटगे यांचे मनःपूर्वक आभार मानले.या यशस्वी पाठपुराव्याबद्दल समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे, भाजपा तालुका प्रमुख शिवाजी नाना मोरे यांचे शेतकऱ्यांनी आभार मानत समाधान व्यक्त केले. तसेच, जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांचेही शेतकऱ्यांनी आभार मानले.

# संत गजानन महाराज मंदीरात मुर्ती प्राणप्रतिष्ठा कार्यक्रम उत्साहात

बीड (प्रतिनिधी)

शहरातील सहयोगनगर भागात असलेल्या ब्रह्माण्डनायक संत गजानन महाराज मंदीरात गणनायक श्री गणेशाची व गुरूनायक श्री दत्त गुरूच्या मुर्तीची उत्साहात प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली. यानिमित्त मंदीरात तीन दिवस धार्मिक कार्यक्र माचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील संत गजानन महाराज मंदीराला २५ वर्षे पुर्ण झाले असून या रौप्य महोत्सव वर्षानिमित्त भाविकांच्या मदतीने नुतनीकरण करण्यात आले असून भव्य अशा मंदीरात आता श्री गणेशाच्या मुर्तीबरोबरच दत्त गुरूची मुर्ती बसविण्यात आली असून पुढील टप्प्यात प्रभु श्रीराम, लक्ष्मण,सीता आणि हनुमंताच्या मुर्तीबरोबरच समर्थ रामदास स्वामी, आणि महादेव मुर्तीची



प्राणप्रतिष्ठापणा करण्यात येणार आहे. दि. ७ ते ९ मे या कालावधीत झालेल्या मुर्ती प्रतिष्ठाणा सोहळ्यात विविध धार्मिक कार्यक्र म आयोजित करण्यात आले होते.मंदीरात बसविण्यात आलेली गणेशाची आणि दत्त गुरूंची मुर्ती अप्रतिम असून विविध कथा आणि पुराणाचा अभ्यास करून ही मुर्ती बनविण्यात आल्याने देशातील एकमेव मुर्ती ठरणार असल्याचे यावेळी मंदीर समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे. भाविकांनी दर्शनाचा लाभ घ्यावा

# जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रा मार्फत सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी खेळाचे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

बीड (प्रतिनिधी)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, अंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रची स्थापना करून केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील खेळाडूंना नियमीत स्वरूपात क्रीडा प्रशिक्षण देण्यात येते, त्याअनुषंगाने जिल्ह्यामध्ये क्रीडा संस्कृतीचे सर्वधन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण तयार व्हावे, तेच राष्ट्रीय व आतंरराष्ट्री स्तरावर दर्जेदार कामगिरी करण्यासाठी खेळाडूंना तंत्रशुध्द प्रशिक्षण मिळावे यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड आणि जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यामाने जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र याद्वारे सॉफ्टबॉल, बेसबॉल, मैदानी, या खेळांचे जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र अंतर्गत दि १५ में से २४ में २०२५ या कालावधीत शिबीराचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सकाळी ०७ ते १० वा. व सायंकाळी ०४:३० ते ०६:३० या वेळेमध्ये करण्यात आले आहे. जिल्ह्यातील जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर नियमीत प्रशिक्षण घेणारया खेळाडूंना सदर शिबीराचा लाभ घ्यावा. या शिबिरात सॉफ्टबॉल खेळासाठी सतिश राठोड, बेसबॉलसाठी रेवननाथ शेलार आणि मैदानी खेळासाठी अविनाश पाटील, क्रीडा मार्गदर्शन करणार आहेत.

अधिक माहितीसाठी सतिश राठोड (सॉफ्टबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९९२५०१९३५३), रेवननाथ शेलार (बेसबॉल क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९०७५४७६७५१), अविनाश पाटील (मैदानी क्रीडा मार्गदर्शक मो. न. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

# तारकेश्वर गडासाठी विकासकामे प्राधान्याने पूर्ण करू – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे आश्वासन

बीड (प्रतिनिधी)

श्री क्षेत्र तारकेश्वर गड येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित वारकरी भाविकांशी संवाद साधताना, गडाच्या विकासासाठी आवश्यक असलेली सर्व कामे प्राधान्याने पूर्ण केली जातील, असे ठाम आश्वासन दिले. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मी वारकरी संप्रदायाचा सेवक आहे. गडासाठी जे कुंपण, सभागृह, रस्ते आणि इतर विकासकामे आवश्यक असतील ती कामे प्राधान्याने सोडवली जातील. मी दिलेला शब्द पाळतो. त्यांनी वारकरी संप्रदायाच्या अध्यात्मिक परंपरेचे कौतुक करत संत-महंतांच्या योगदानाचे स्मरण केले.

या कार्यक्रमाला आमदार सुरेश धस, महंत आदिनाथ महाराज, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळक, स्वप्निल बंद, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्यासह विविध अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात संत-महंतांनी उपमुख्यमंत्र्यांचे स्वागत करून त्यांना आशीर्वाद दिले. गडाच्या उन्नतीसाठी शासनकडून सातत्याने मदत केली जाईल, असा विश्वास यावेळी व्यक्त केला. गडावरील रस्ते, मूलभूत सुविधा आणि वारकऱ्यांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उभारण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. वारकरी भाविकांत उपमुख्यमंत्र्यांच्या या घोषणेमुळे आनंदाचे वातावरण होते.